
१६५५
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. १३८३



REFBK-0008715
REFBK-0008715


अनुक्रम 21258 ... दि:
क्रमांक 72583 ... नों: दि

# मंगल - ज्योति

## ( मराठी स्फुट–कविता संग्रह )

कवयित्रीः—श्री. सौ शान्तादेवी तडवी (परदेशी)
राष्ट्रभाषा कोविद

REFBK-0008715
REFBK-0008715



प्रथमावृत्ति डिसेम्बर १९५५

मूल्य — सव्वा रुपया

प्रकाशिका :—

सौ. शान्तादेवी तडवी (परदेशी)

१९४६ रायखड, अहमदाबाद (गुजराथ)

भाषांतरा सहित सर्व हक्क कवयित्रीचे स्वाधीन

—: पुस्तक मिळण्याची ठिकाणें :—

१ सौ. शान्तादेवी तडवी (परदेशी)

१९४६ रायखड,

रायखड रोड, अहमदाबाद नं. १

२ श्री. जे एस् तडवी एम. एल. ए.

(रिटा. असि. डे एज्यु इन्स्पेक्टर पुणें)

७, जिल्हा पेठ, जळगांव (पूर्व खानदेश)

३ महाजन बुक डेपो

गांधी रोड, सेन्ट्रल बँक जवळ, अहमदाबाद

४ श्री एस् व्ही तानवडे

ताडदेव बुक डेपो

सोनावाला बिल्डिंग मुंबई नं. ७

मुद्रक :— श्री. नटवरलाल पुरुषोत्तमदास देसाई,

श्री कमलेश आर्ट प्रिन्टरी,

वैश्य सभा बिल्डिंग, जमालपुर रोड, अहमदाबाद.



**पितृतुल्य माननीय श्री भुजंगराव केशवराव दळवी.**

B. A. LL. B; M. L. A.

सेवानिवृत्त डिस्ट्रिक्ट जज्ज; स्वागताध्यक्ष म. साहित्य संमेलन,

बेळगांव, १९४६

# अर्पण-पत्रिका

श्री. सन्माननीय परमपूज्य पितृतुल्य

वी. के. दळवी B. A. LL. B; M. L. A.

सेवानिवृत्त, डिस्ट्रीक्ट जज्ज.

स्वागताध्यक्ष म. सा.

संमेलन बेळगांव.

यांचे सेवेशीं

कृतज्ञतापूर्वक

समर्पित.

विनीता

सौ. शान्तादेवी तडवी (परदेशी)

# छापत आहे

## मॉंके लाल (हिन्दी)

पूज्यपाद बापू, राष्ट्रपति राजेन्द्रबाबू, पं नेहरू. सरदार, नेताजी, तिलक, आज़ाद इनके जीवन झाँकींकी उद्‌बोधक व रोचक कविताओंका संग्रह.

## साखर फुटाणे (मराठी) बाल-गीत-संग्रह

---

### सौ. शान्तादेवी तडवी (परदेशी) कृत अन्य पुस्तकें

## प्रकाशित

**शांतागीतें**—(मराठी स्फुट कविता संग्रह) मुंबई व मध्यप्रांत सरकारनें शाळांतील लायब्ररी व बक्षिसांकरितां मान्य केलेलें. इन्दोर ग्रन्थोत्तेजक मंडळाकडून पारितोषक प्राप्त ।

**सुमनमाला**— बाल गीत संग्रह लायब्ररी व बक्षिसांकरितां सरकार मान्य

**महिला रत्न माला**—ऐतिहासिक स्त्रियांच्या स्फूर्तिप्रद कवितांचा संग्रह

२९२८४
२३४३ २३/७/५८

# दोन-शब्द

---

खरें म्हटलें तर भगिनी शांतादेवी परदेशी यांच्या काव्य-संग्रहाला प्रस्तावनेची कांहींच आवश्यकता नाहीं. शांतादेवींचा महाराष्ट्रास सुमारें तीस वर्षांपासून चाँगला परिचय आहे. लोकमित्र भारतमित्र, काव्य-रत्नावलि शिक्षक, ज्ञान-प्रकाश इत्यादि मासिकांतून व वर्तमान पत्रांतून अनेक वर्षांपासून त्यांच्या कविता प्रसिद्ध होत आहेत. निरनिराळया दिवाळी अंकांत त्यांच्या 'अंधमाता' 'आकाश-दीप' 'मानवतेची-ज्योत' 'फूटपाथचा मुसाफर' इत्यादि कवितांना लोकप्रियता लाभली आहे. शांतादेवींनीं १९२८ सालींच 'शांतागीतें' या नांवानें आपला पहिला सग्रह प्रसिद्ध केला होता. त्या नंतर 'सुमन माला' (बाल-गीतें), 'रमणी रत्न-हार' हीं काव्यें व अलीकडे 'राजेन्द्र-शतक' हें नवें काव्य प्रसिद्ध झालें आहे.

या प्रमाणें शारदेची सेवा तीस वर्षे चालू आहे. लहानपणांपासूनच शाँतादेवींना कवितेची आवड आहे. त्यांना लहानपणीं संस्कारही चांगले लाभले. त्यांचे वडील नेहमीं त्यांना मांडीवर घेऊन 'कवित्त' 'दोहे' म्हणत आणि शांतादेवी मोठ्या आनंदानें ते ऐकत; आणि सुखोद्गत करीत. प्रसिद्ध कवि विनायक धरणगांवला त्यांच्या घरांतच भाडयानें रहात शांतादेवी लहानपणीं विनायकांच्या कडी खांद्यावर खेळल्या-ही पार्श्वभूमि घेऊनच त्या वयाच्या १४-१५ व्या वर्षींच पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेजांत शिकण्यास आल्या कॉलेजांत पाठ केलेल्या कविता जशाच्या तशा न म्हणतां त्यांच्यांत योग्य ते फेरफार करून त्या पटकन म्हणून दाखवीत व परीक्षकांना चकीत करीत.

या संग्रहांत प्रसिद्ध होत असलेल्या कविता वांचून पाहिल्या म्हणजे असें आढळून येईल कीं शांतादेवींचे संस्कार आणि वळण जुनें आहे. १९२० सालापासून काव्यक्षेत्रांत जे भले-बुरे प्रयोग झाले त्यांची शांतादेवींच्या

काव्याला फारशी बाधा झाली नाहीं. शांतादेवी गझल लिहितात पण त्याच-बरोबर "भूपती! खरे ते" या लोकप्रिय चालीची अजून त्यांना आवड आहे त्यांचे काव्य विषयही विनायक, तांबे, यशवंत इत्यादि अभिजात कवींच्या धाटणीचे आहेत. शांतादेवी मनो-विकलन Psycho-analysis करण्याच्या भानगडींत पडत नाहींत. स्वतःचें मन हातीं घेऊन त्याच्यांतला गुंता चार चौघांसमोर उकलून दाखवायचा, स्वतःचे खाजगी हर्ष, शोक यांचें प्रदर्शन करावयाचे ही प्रवृत्ति शांतादेवींना मान्य नाहीं स्वतःच्या भावनांना सामुदायिक रूप दिल्यावरच त्या भावनांना काव्यांत प्रवेश करण्याची परवानगी देतात. जुन्या अभिजात कवींचा हाच संकेत व संयम होता. या सम्प्रदायास अनुसरूनच शांतादेवींनीं भोंवतालच्या सामाजिक दुखाःकडे सहृदय-तेनें व सहानुभूतिनें पाहिले आहे अनाथ स्त्रिया, नाडलेल्या स्त्रिया, विधवा इत्यादि नाना प्रकारच्या दुःखी स्त्रिया त्यांच्या काव्यांचे विषय झाले आहेत. समाजाचा भोंदूपणा, लफंडाव यांवर शांतादेवींनीं आपल्या काव्यांत प्रहार केले आहेत.

शांतादेवी द्विभाषी आहेत. मराठी प्रमाणें हिंदी सुद्धां त्यांची मातृ-भाषा आहे हिंदी काव्य वाङमयांतील रहस्यवाद, छायावाद, प्रगतिवाद यांचाही यथायोग्य परामर्ष शांतादेवींनीं आपल्या काव्यांत घेतला आहे. शांतादेवींच्या काव्यांत कदाचित् गरुडाच्या उंच भराऱ्या आढळणार नाहींत; भावनांची व प्रतिभांची खोली चटकन नजरेस येणार नाहीं तथापि त्यांच्या भाषेंत प्रसाद आहे. त्यांच्या काव्याचा ओघ सरळ वहात असतो त्यांच्या काव्याचे विषय जुने असले तरी बहुविध आहेत. त्यांची निष्ठा प्रामाणिक आहे हें निखालस पणें मीं सांगूं शकतो. रसिक वाचकांनीं शांतादेवींच्या या नव्या-काव्य संग्रहाचें यथोचित् स्वागत करावें, एवढी त्यांना प्रार्थना करून हे दोन-शब्द मीं पुरे करतो.

सुषमा डेक्कन जिमखाना
**पुणें नं. ४**
२? मे १९५५.

**वि. द. घाटे**

# नम्र निवेदन

मंगलमय, जगच्चालक दयाघन प्रभूच्या कृपेनें आज मीं "**मंगल ज्योति**" हें पुस्तक रसिक वाचक वन्धू भगिनींच्या सेवेस सादर करीत आहे

महाराष्ट्र व वऱ्हाड मध्यप्रांतांनील निरनिराळया मासिकांतून वेळोवेळां प्रकाशित झालेल्या कवितांचा एक लहानसा संग्रह काढावा अशी माझी तीव्र इच्छा होती; परन्तु केवळ मनुष्याच्या इच्छेनेंच कार्य सफलता होते असें नव्हे; तर त्याला दैवी म्हणा देवाची म्हणा नियतीची म्हणा अनुकूलतेची जोड असावी लागते. असो त्या जगन्नियत्या प्रभूच्छेनें मंगल-ज्योतीच्या प्रकाशनाची सुसंधि आतां मिळत आहे.

सदर पुस्तकांतील कविता साहित्यिक कसोटीवर कितपत टिकतील हें विद्वज्जन ठरवतील अन्तःकरणांतील विशुद्ध स्नेह भरून या ज्योति मीं पेटविल्या आहेत. त्यांचा प्रकाश कुठवर जाईल व त्या कितपत तेवत राहतील याचीही मला कल्पना नाहीं

मम हातीं इवलीशी पणती
स्नेहें भरली दीप ज्योतिऽ
घन अधारीं, झंजावातीं
देईल तेज किती ?

न कळे !

मोठमोठ्या साहित्यिकांनीं देवी शारदेची महापूजा बांधली असेल मीं या मंगल-ज्योतींनीं तिची आरति करण्यास उभी आहे पंढरपूरसारख्या पवित्र-क्षेत्रीं या वर्षाअन्तीं भरत असलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे शुभसमयीं शारदा देवीचे चरणीं या ज्योति घेऊन उभी राहण्याची

सुवर्ण-सधि त्या पांडुरंगाचे कृपेनें मिळत असल्याने एक प्रकारची धन्यता वाटते.

या पूर्वी प्रकाशित केलेल्या पुस्तकांचा रसिकांनीं स्वीकार केला; साहित्य-संस्थांनीं त्यांना पुरस्कारिलें व सरकारने त्यांस मान्य केलें; परन्तु आतां शाळांसाठीं सरकार मान्यतेची आवश्यकता नाहीं. सिनेमाच्या अगणित पद्यावलि खपणाऱ्या देशांत कवितेचीं पुस्तकें खपविण्याचा नामवंत कवींनाही विचार उत्पन्न होतो परन्तु आनचे दयाळू सरकार आतांशी साहित्य-क्षेत्राकडे लक्ष्य देत आहे, ही मोठी समाधानाची गोष्ट आहे. लहानमोठ्या सर्व साहित्यिकांना झीज न सोसून साहित्य-सेवा करण्याचा सुदिन लौकरच उगवो अशी नम्र याचना त्या प्रभू-चरणीं करीत आहे

दोन-चार सिनेमांतील गाणीं लिहून देऊन हजारों रुपये मिळविणारे गीतकार एकीकडे ! आणि अनेक वर्षांच्या तपश्चर्येनंतर साहित्य निर्मिति करून जनता-जनार्दनाचे पदीं आपली सेवा सादर करणारे निर्धन साहित्यिक एकीकडे! ही हृदयास पीळ पाडणारी विषमता खेदजनक नव्हे कां ?

असो ! उदार हृदयी वाचक बन्धु-भगिनी माझ्या या अल्प-सेवेचा स्वीकार करतील व माझा उत्साह वाढवितील अशी मीं आशा करते.

आजच्या या मंगल प्रसंगीं ज्या थोर साहित्य-तज्ज्ञांनीं मला प्रारंभापासून साहित्य-निर्मितीस अत्यंत कळकळीनें व प्रेमानें प्रोत्साहन दिलें त्यांची आठवण होऊन माझें हृदय भरून येतें. त्यांत पूज्य स्व. लाला भगवान दीन प्रो. हिंदू युनिव्हर्सिटी बनारस, अमरावतीचे सुप्रसिद्ध दे. भ पूज्य स्वर्गीय ग. ब. खापर्डे; स्व दु. आ. तिवारी महाराष्ट्र शाहीर जळगांव; स्व. नाना फडणवीस संपादक काव्य-रत्नावलि जळगांव; माझे जेष्ठ दीर माननीय श्री जे. एस तडवी एम. एल. ए. जळगांव; स्व. ल. ग. लेले शास्त्री प्रो. सर परशुराम भाऊ कोलेज पुणें माननीय श्री. वि. द. घाटे सो एम. एल ए व सेवा निवृत्त डे डायरेक्टर ऑफ

एज्युकेशन मुंबई प्रांत; श्री. एस. एस. शिर्के सो व त्यांच्या सुविद्य पत्नि विदुषी अ. सौ. आनंदीबाई पुणें; श्री. बा. ग. जगताप पुणें, श्री. वा. भा. पाठक प्रो. वाडिया कॉलेज पुणें; प्रिन्सिपाल ग. ह. पाटील पुणें; मेघदूताचे अनुवादक पूज्य श्री. ग. नी. कात्रे सो सेवा-निवृत्त डिस्ट्रिक्ट जज्ज कोल्हापूर; माननीय श्री. एम. एस. पाटील सो सेवा-निवृत्त डिस्ट्रिक्ट जज्ज मुंबई, व श्री. अ सी. केळूसकर संपादक धनुर्धारी मुंबई यांच्या नांवांचा विशेष उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं.

तसेंच श्रद्धास्पद श्री. वि. द. घाटे साहेब यांनीं आपला अमूल्य वेळ खर्चकरून या संग्रहास योग्य असे "दोन-शब्द" लिहून माझा उत्साह द्विगुणित केला म्हणून मी त्यांची अत्यंत उपकृत आहे।

ज्या माझ्या पूज्य व अत्यंत प्रेमळ पिताश्रींनीं लहानपणां पासूनच थोर थोर कवींच्या काव्यामृताचें मला प्राशन करवून सरस्वती-देवीची मनोभावें पूजा करण्याइतकें समर्थ केलें ते माझे वात्सल्यमय पिताश्री स्व. "**मंगलसिंग**" माझ्या हृदयाच्या पंतीतून काव्यरूपानें तेवत असलेल्या या ज्योति बघण्यास आज जिवंत असते तर...! पण—विधि घटना कांहीं और असते, व मानवी इच्छेस तिजपुढें सतत मान तुकवावीच लागते ! असो माझ्या अति पूज्य वडिलांचे पवित्र स्मृति साठीं या पुस्तकास "मंगल ज्योति" हें नांव देऊन मीं आपली श्रद्धांजलि त्यांस समर्पित आहे। तसेंच पितृ-तुल्य व अति श्रद्धेय श्री. **भुजंगराव केशवराव दळवी** साहेब बी. ए. एल, एल. बी; एम. एल. ए. सेवा निवृत्त डिस्ट्रिक्ट जज्ज यांचे ठायीं आमच्या अवघ्या कुटुंबास जें प्रेम व आदर वाटत आहे त्याचें द्योतक म्हणून त्यांचे संमतीनें हें पुस्तक त्यांचे चरणीं मीं सविनय समर्पण करीत आहे.

सदरहू पुस्तक प्रकाशित करण्याचा मानस बहुत वर्षांपासून होता; परन्तु सरकारी नोकरी निमित्य माझ्या पतीच्या मुंबई प्रांतांतील निरनिराळ्या भागांत बदल्या होत असल्यामुळें तसच पाश्चिमात्य देशांतील युद्धकालीं व तदनतर सर्वांस भासणाऱ्या कागदाच्या महागतेमुळें व दुर्मिळतेमुळे तसेंच

छपाईच्या कांहीं अनपेक्षित अडचणीमुळें तो बेत स्थगित करणें भाग पडलें. त्या दयामय परमेशाचे कृपेनें आतां तें प्रसिद्ध होत असल्यामुळें मला एक प्रकारचा अननुभूत आनन्द होत आहे त्यां कामीं आमचे पूज्य काका श्री हीरालाल करमचन्द शाह रसिक प्रिन्टरीचे मालक अहमदावाद यानीं अत्यत परीश्रम घेऊन उदार अन्तःकरणानें माझा उत्साह वाढविला व मुख पृष्ट छापून पुस्तकाचे बाह्य सौन्दर्यात भर घातली म्हणून मीं त्यांचीं फार आभारी आहे.

तसेंच कमलेश आर्ट प्रिंटिंग प्रेसचे मालक श्री. नटवरलाल पुरुषोत्तमदास देसाई व संपादक "बाल-जगत" यांना गुजराती भाषा जाणणाऱ्या प्रेस-कर्मचाऱ्यांकडून हें पुस्तक मराठींतून छापवून घेताना जो त्रास झाला तो त्यांनीं स्वेच्छेनें सहन करून अत्यंत कळकळीनें काम वक्तशीर व सुबक रितीनें करून दिल्याबद्दल मीं त्यांचे आभार मानते. मराठी भाषेच्या अनभिज्ञतेमुळें योग्य ती दक्षता घेऊनही कांहीं मुद्रण दोष राहिले आहेत. माझ्या अल्पमती प्रमाणे परप्रांतांत मराठी भाषेच्या योग्य ज्ञानाचे अभावीं असें होणं अपरिहार्य आहे व म्हणून सकृत्दर्शनीं प्रांजलपणें भासणाऱ्या या अडचणीची प्राज्ञ वाचकांस जाणीव होऊन या मुद्रण दोषाकडे ते दयार्द्र दृष्टीनें पाहतील अशी आशा आहे. मुद्रा-राक्षसामुळें विपरीत अर्थ होऊं नये म्हणून "शुद्धि-पत्र" पुस्तकास जोडलें आहे. सुज्ञ वांचकास त्याचा योग्य ठिकाणीं उपयोग करण्याची विनंति आहे.

शेवटीं त्या जगन्नियन्त्या प्रभूचे आभार मानून व जनता-जनार्दन या माझ्या सेवेचा स्वीकार करील अशी गोड आशा अन्तःकरणांत बाळगून मी रसिकांचा निरोप घेते ।

विनीता

**सौ शान्तादेवी तडवी.** (परदेशी)

# अनुक्रमणिका


| क्रमांक | कवितेचं नांव | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | प्रभु ! | १ |
| २ | साहित्यिक महाराष्ट्र | २ |
| ३ | घ्या राबवून | ५ |
| ४ | महादजी शिंद्याच्या छत्रीचं दर्शन | ६ |
| ५ | ओझरतें दर्शन | ८ |
| ६ | वा फुला ! | ९ |
| ७ | ओढ | १० |
| ८ | कसें जगावें ? | १२ |
| ९ | कसें पाहवत नाहीं | १३ |
| १० | स्वर्गही तुच्छ गमे त्यां पुढें | १४ |
| ११ | दयाळू देवा | १५ |
| १२ | दर्शनोत्कंठिता | १६ |
| १३ | करपलेली कळी | १८ |
| १४ | शुक्राचा तारा अजुनी उगवत नाहीं | १९ |
| १५ | भिकारीण | २० |
| १६ | चतुर नावाडी | २२ |
| १७ | अशाश्वत जीवन | २३ |
| १८ | तयाचें गावें जगीं गुणगान | २४ |
| १९ | अमंगल दर्शन त्याचें जनीं | २५ |
| २० | पण अंतीं | २६ |
| २१ | वठलेला वृक्ष | २७ |
| २२ | तेथें चल जाऊं | २९ |
| २३ | संभावित | ३१ |

| क्रमांक | कवितेचें नांव | पृष्ठ |
|---|---|---|
| २४ | नेत्र उघड वा मीट | ३३ |
| २५ | नव–हिन्द निर्मिणाऱ्या | ३५ |
| २६ | धन्य माता | ३६ |
| २७ | वसंतागमन | ३७ |
| २८ | कर आत्मनिरीक्षण | ३८ |
| २९ | कधीं विधवांचा काळ पालटेल | ३९ |
| ३० | वीर रमणी | ४१ |
| ३१ | तयाला कुणि कां तुडवावें ? | ४२ |
| ३२ | मनांप्रति | ४४ |
| ३३ | डोळे झांक. | ४६ |
| ३४ | बुलबुलास | ४७ |
| ३५ | जगी भामिनी, तीच धन्या खरी | ४८ |
| ३६ | श्री भारत जननी ! | ५० |
| ३७ | राष्ट्र ध्वज | ५१ |
| ३८ | फोल जीवित | ५२ |
| ३९ | अपूर्णता | ५४ |
| ४० | आठवण | ५५ |
| ४१ | कैफियत | ५६ |
| ४२ | आई | ५८ |
| ४३ | गोड आठवण | ५९ |
| ४४ | पूजा | ६० |
| ४५ | आशा | ६१ |
| ४६ | कर दिला | ६२ |
| ४७ | चांदणें | ६३ |
| ४८ | माझी नाव पडे दरियांत | ६४ |
| ४९ | क्षणांपूर्वी | ६६ |

| क्रमांक | कवितेचें नांव | पृष्ठ |
|---|---|---|
| ५० | तुझ्या प्रकाशांत | ६८ |
| ५१ | जाऊं दे अति दूर | ७० |
| ५२ | चल उचल पाउलें भराभरा | ७२ |
| ५३ | मधुर मीलन | ७४ |
| ५४ | अशी उदासीनता सोड गडे | ७६ |
| ५५ | प्रतीक्षा | ७७ |
| ५६ | निरोप दे | ७९ |
| ५७ | निज देशासाठीं लढले | ८१ |
| ५८ | शुकास | ८४ |
| ५९ | दुर्मिळ दर्शन | ८६ |
| ६० | चुकतील कधिं या यातना | ८८ |
| ६१ | कशी ग! मीं पेटवुं ही पणती? | ९० |
| ६२ | 'महात्मा' गेला | ९२ |
| ६३ | प्रणति | ९५ |
| ६४ | आकाश दीपास | ९७ |
| ६५ | प्रभु-दर्शन | ९९ |
| ६६ | प्रेम-ज्योत | १०० |
| ६७ | रिता-घट | १०१ |
| ६८ | मानवतेची ज्योत | १०३ |
| ६९ | जमीन द्या | १०५ |
| ७० | दयाळा! त्या क्षणीं पाणीं | १०६ |
| ७१ | अन्धमाता | १०९ |
| ७२ | गिरणीचा भोंगा | ११२ |
| ७३ | फूटपाथच्या मुसाफरास | ११४ |
| ७४ | कृषिवलास | ११६ |
| ७५ | माझीया ग! अंगणांत | ११८ |

| क्रमांक | कवितेचे नांव | पृष्ठ |
|---|---|---|
| ७६ | हंसा प्रति ... ... | ...१२० |
| ७७ | जंगली गोटे ... ... | ...१२१ |
| ७८ | लोकशाहीचा ध्वज फडकूं द्या ... | ...१२२ |
| ७९ | पार्श्वनाथास ... ... | ...१२३ |
| ८० | दीप घेऊनियां करीं ... ... | ...१२५ |
| ८१ | मागणें ... ... | ...१२७ |
| ८२ | आतां नको जयघोष ... ... | ...१२८ |
| ८३ | चिरंजीव हो ... ... | ...१२९ |
| ८४ | अभंगवाणी ... ... | ...१३१ |
| ८५ | अमर तुझें बलिदान ... ... | ...१३६ |
| ८६ | आशा–दीप ... ... | ...१३७ |


★

# शुद्धिपत्र

| अशुद्ध | शुद्ध | पान | ओळ |
|---|---|---|---|
| ऐक | ऐकुं | १ | ११ |
| भिळशा | मिळशा | ९ | १० |
| वाजवू | वाजवूं | १४ | १७ |
| कली | कळी | १८ | कवितेचें नांव |
| अस्फुटस | अस्फुटसें | २१ | १३ |
| मिळवुनी | मिळवुनी | २३ | १ |
| दैवाच | दैवाचें | २६ | १० |
| चन | चैन | ३४ | ३ |
| वालदान | वलिदान | ३५ | १४ |
| वधुनिया | वघुनिया | ३९ | १३ |
| सगरी | संगरी | ४१ | ३ |
| भामीनी | भामिनी | ४८ | कवितेचें नांव |
| रग | रंग | ५२ | १६ |
| धराला | घराला | ६० | १ |
| रवुपतील | खुपतील | ६० | ६ |
| नव | नव | ६० | १३ |
| दुजनांस | दुर्जनांस | ६१ | १४ |
| वध | वघ | ६२ | ३ |
| जगाल | जगाला | ६२ | १४ |
| आलिगुनी | आलिंगुनी | ६६ | ९ |
| पुष्य | पुण्य | ६८ | १५ |
| रवाया | खाया | ७० | ५ |
| उलघून | उल्लंघून | ७२ | ८ |
| प्रभाकर | प्रभाकरा | ७२ | १० |

| अशुद्ध | शुद्ध | पान | ओळ |
|---|---|---|---|
| तिभिरांत | तिमिरांत | ७४ | १५ |
| समपण | समर्पण | ७४ | १७ |
| ऊच | उंच | ७६ | १७ |
| रणरगीं | रणरंगीं | ८१ | २ |
| फॅलडर्स | फलडर्स | ८२ | १३ |
| वरत | वरतीं | ८२ | १६ |
| बदिवासाचे | बंदिवासाचे | ८४ | १८ |
| रुकनियां | झुरुनियां | ८५ | २ |
| बाल | बोल | ८५ | ३ |
| पहीला | पाहिला | ८६ | १ |
| लक्षमण | लक्ष्मण | ८६ | ११ |
| कापीले | कापले | ८६ | १५ |
| वषोंत | वर्षांत | १०३ | १९ |
| तेजास्विनी | तेजस्विनी | १०९ | ७ |
| कांठीं | कांठीं | १११ | १ |
| खगुनिया | खंगुनिया | ११२ | १८ |
| मजूरा | मजूरां | ११३ | ५ |
| दुख | दु:ख | ११३ | ५ |
| उघड | उघडें | ११६ | ३ |
| वधुन | बधुन | ११६ | ६ |
| हिसा | हिंसा | १२३ | १८ |
| नरकासुरातें | नरकासुरातें | १२५ | १३ |
| भारतचा | भारतचा | १२९ | ३ |
| शक्तिवत | शक्तिवंत | १३२ | १३ |
| ऐश्या | ऐशा | १३२ | १६ |
| दरबारीं | दरबारीं | १३३ | ११ |
| शाधुं | शोधुं | १३४ | १० |

27268 13483 23/1 8694

## प्रभु !

प्रभु ! तव नगरी, नगरी सोन्याची
वाण, दासाला अन्नाची ! ॥१॥
प्रभु ! तव चरणीं; नित्य रमा लोळे
सेवकां, पै नच एक मिळे ! ॥२॥
प्रभु ! तव सदनीं, ऐरावत डोले
फिरूनी पाय सख्या ! शिणले ! ॥३॥
प्रभु ! तव भरलें, भरलें भंडार
दास, फिरतो दारोदार ॥४॥
अश्रुचीं सुमनें, वाहतसे ताजीं
कां बरें प्रभुजी ! नाराजी ? ॥५॥
हांक हृदयाची, ऐकं न कां आली ?
जिवाची कुरवंडी केली ॥६॥
कृपादृष्टीनें, मातीचें सोनें—
करीशीं, दगडाचीं रत्नें- ॥७॥
कां न ती वळली, मजवरती नजर ?
कन्हैया ! झालों बेजार ॥८॥
सख्या ! गोपाला ! ब्रीद आठवावें
'पतित मी', मला उद्धरावें ॥९॥
वाण सौख्याची, पडली मज जगतीं
तरी तव होईल अपकीर्ति ॥१०॥
म्हणोनी यावें, सत्वर यदुराया !
दीन-दासाला ताराया ! ॥११॥

# साहित्यिक महाराष्ट्र

महाराष्ट्र मंगला ! स्वीकरी प्रणाम करितों तुला
दिशां-दिशांतुन, सदैव फांको, कीर्ति तुझी उज्वला !
अनेक ते नरमणी पहुंडले, तुझ्याच अंकावरीं ।
आळवुनी बहुविधें तवगुणां, गाई वागीश्वरी ।

* * *

निर्मळ 'ज्ञानेश्वरी' 'तुकाचे' अभंग, ते सोज्वळ
'बहिणा', 'मुक्ता', 'जनी', भक्तिचा, लुटवीती परिमळ
'एकनाथ', 'पंडीत', 'मोरया', 'चोखामेळा' मळ--
काढुन, बनवी, भक्ति-जलानें, मानव-मन निर्मळ !

* * *

थाप डफावर पडे, सु-डौल भगवा, तो फडफडे—
उडवित घोडे, वीर चालले, दक्खनचे फांकडे ।
शाहिर ललकारतो पवाडे, अंतराळीं स्वर भिडे ।
मायभूमिच्या बहादुरांच्या अंगीं रणश्री चढे !
'रामदास' पाजिती, चहुदिशीं बोधामृत भाविका
'भूपाळी' ती 'होनाजी' ची, जागविते सकळिकां !
'पानपतीं' आहुति, किति पडे, झाली भाग्यक्षतिऽ
किति सदनीं, अंधार दाटला, विझल्या कुल-ज्योतिऽ !
झांशीची दामिनी, कडाडुन पडली समरांगणीं
हताश झाली, जनता थकली, नित्य जाउनी रणीं ।

लावणिची पिचकारी घेई, 'रामजोशी' निज करीं—
तुषार पडती, मानस-कलिका, उमले हळु अंतरीं !
श्रृंगाराच्या फुले फुलोरा, महाराष्ट्र-अंगणीं
भक्ति, प्रीति, बागडती दोन्हीं, जशा जुळया बहिणी !

*　　*　　*

"स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्काची" करी घोषणा
गीतेचें पीयूष पाजिती 'लोकमान्य' बहु-जनां।
'आगरकर' 'चिपळुणकर' उघडी ज्ञानाचा खजिना
समाजचित्रें, दावी 'आपटे' चित्रपटांसम जनां !
साहित्यिक-सम्राट 'केळकर' काढी पत्र 'केसरी'
महाराष्ट्राला पुन्हां जागवी, त्याची ललकारी।
'टिळकांची' तीं प्रेमळ वाणि आणि गोड गाणीं
'केशवसुत', तांबे', 'शेखर', चे, स्वर घुमती कानीं !
काव्य मानसीं, राजहंस' तो, डुलतो रामाचा'
संगर-गीतें गाई 'तिवारी' शाहीर देशाचा।
करुण-रसाच्या 'साने' गुरुजी, वाहविती पूर
पत्थरासही पाझर फोडी हृदयाचा सूर !
'बालकवी' चा, निर्झर, मोती उधळित जाई पुढें
'ज्युलियनाची' 'शराब', 'साकी' 'मैफिल' कीं उघडे ।
रम्य 'आंबराई' 'गिरीशाची' शीतलता देई
'यशवंता' ची येई पुढनीं, ती प्रेमळ 'आई' !
'अत्र्यां' च्या झेंडुच्या फुलांतिल, खाउनिया खोबरें—
असा कोण, अरसीक जयाचें अंतर नाहीं स्फुरें ?

यथा-शक्तिनें तुला पूजिलें, भक्तांनीं, शारदे !
प्रास, यमक, वृत्तास, विसरले, जन, मंजुळ नादें !
ताल, सुराचा, नको मुलामा, उज्वल काव्याला—
साज कशाला, निसर्ग-सुंदर, जें असतें त्याला।
चंडोला-सम, स्वैर उडूं दे, कवि ! तव वैखरिला
'प्रेम' 'शांति' चा निरोप मंगल देई' जगताला !
महाराष्ट्र मंगला !

卐

## घ्या राबऊन

घ्या राबऊन कितिही—वाली कुणी न उरला !
ये दीन-शिक्षकाची—जगतीं दया कुणाला ? ॥१॥

दो, चार, वर्ग यांचीं—कंठांत माळ माझ्या—
नियमीत सर्व कांहीं—अभ्यास घ्यावयाचा ॥२॥

खोली बसावयाची—जणु एक 'ब्लॅकहॉल'
वारा, उजेड नाहीं—होती अनंत हाल । ॥३॥

रुसतील काय पालक—वदतां मुलांस कांहीं
साहेब कोपतील—येतां न त्यांस कांहीं ॥४॥

चिंतारुपी दुधारी—तलवार टांगलेली
राहे, शिरीं सदा या—चित्तास शांति कसली ? ॥५॥

वेतन मिळे अपूरें—तेंही अनित्य वेळीं
जाळी प्रपंच—चिंता—नच सौख्य—लेखभालीं ॥६॥

झाली विदग्ध मनिषा—वदतो म्हणून सकलां—
'घ्या राबऊन कितिही—वाली कुणी न उरला' ॥७॥

★

# महादजी शिंद्याच्या छत्रीचें दर्शन

हे शिंदे-कुल-भूषणा ! तुझ्या दर्शना, इथें मीं आलें
किति धन्य धन्य मम चित्ताला वाटलें ।

महादजी ! सु-वीरा तुझी, पाहतां अजी, मूर्ति ही नयनीं ।
किति अश्रु दाटले आनंदें लोचनीं ।

शिरिं पगडी चांद त्यांवरी, हिरे बहुपरी, झळकती त्यांत—
शोभतो हार तो मोत्यांचा कंठांत ।

ठेवियला अंकांवर, तीक्ष्णखंजिर, ढालही जवळी
जी अरिच्या खड्गां पडो देई ना बळी !

करीं म्यानबंद समशेर, शत्रुला जेर, रणीं करणारी ।
घनघोर संगरीं नित्य विजय वरणारी ।

ज्या तलवारीनें सदा, राष्ट्र-आपदा, वारिली सारी
म्यानांत रमे ती ' महादजींची ' प्यारी ।

ज्या तलवारीच्या बळें, शत्रुचीं दळें, कापिती शिंदे
रण—रंग सोडुनी बसली ती आनंदें

अजि अरि-रक्ताचा टिळा, दिसे ना मला, सखे ! तव भालीं
गतधवा भाससी जाहलीस या कालीं ।

हे तेजस्विनी, असिलते ? समर-देवते ! शांतितें वरिशीं
ही काय वृत्ति तूं दुबळ्याची प्रकटिशीं ।

पाटिलकरिं करुन विहार, सखे! बहुकाल काय शिणलीस?
मग योग्यच हें, म्यानांत आतां निजलीस।

घे सुखें गडे! विश्राम, परि पडे काम, भरतभूमिचे-
तइं देह आपुला लाव कारणीं तिचे

हे शिंदे-कुल-भूषणा! प्रार्थिते पुन्हां, कृपेची छाया-
या दीन-जनांवर सदा असूं द्या, राया।

# ओझरतें दर्शन

ओझरतें दर्शन झालें, नेत्र धन्य जाहले।
सांज-दीप पदराखालीं—
घेउनियां ललना आली
वृंदावनीं चढतांना मी, मोहिनीस पाहिलें ॥ १ ॥

शुभ्र—वसन, उज्वल—कांती
गंभिरता वदनीं होती
मंगलता विलसे नयनीं, दिव्य-रूप देखिलें ॥ २ ॥

दीपज्योति तुलसी पुढती
लावुनियां केली प्रणतिऽ
अस्फुटसें मंजुळ कांहीं, बोल गोड ऐकिलें ॥ ३ ॥

'वेणू' कीं हृषिकेशाची ?
'वीणा' कीं देव-ऋषीची ?
स्वर्गीच्या संजिवनीनें मूर्त रूप घेतले ? ॥ ४ ॥

सुर-ललना 'शचि-देवी'ही ?
कीं 'लक्ष्मी'? गृह-लक्ष्मीही ?
कीं 'नंदिनी'? 'कल्पलता' ही गूढ मनां ना, कळे ॥ ५ ॥

इंद्र-धनु क्षण-भर दिसतें
चित्त तिथें वेधुन जाते !
चपलेच्या नव तेजानें, नसे कुणा मोहिलें ? ॥ ६ ॥

# वा फुला !

वा फुला ! तुला पाहून मोद मज होई
तव चारु सुगंधें मन्मन मोहुन जाई ॥ १ ॥

तुज दिला रंग, अति-रम्य, देव-रायानें
हंसवितें जगातें, तुझें मनोहर हंसणें ॥ २ ॥

तुज कटीवरी घेऊन मिरविती वेली
घालिती भृंगतति प्रदक्षिणा भंवतालीं ॥ ३ ॥

तूं वसुंधरेचें भूषण होशी कुसुमा !
निज काव्यि वर्णिती, तुझाच सत्कवि महिमा ॥ ४ ॥

पण कोमल तनु जें सुईनें छेदुन घेशीं
तैं हार होउनी मिळशीं प्रभु—हृदयाशीं ॥ ५ ॥

卐

# ओढ

मन ओढ घेतसे तुझ्याकडे
परी, कडे—कपारी किती पुढें !

ऊंच किती तूं वसशीं जाऊन।
होई उदासिन मन, भेटीविण
थकली काया, शिणले लोचन।
कठिण वाट किति, सांग पुढें ? ॥ १ ॥

सोंसाटयाचा सुटतो वारा।—
कधीं, उन्हानें जीव घाबरा।—
होई; मिळेना, कुठें निवारा।
तसाच जातों, पुढें पुढें ॥ २ ॥

दुर्गम-पथ अति, कुणीं न सांथी।
मीच एकटा जातों पुढतीं।
'संकट समयीं, कुणीं न येती'।
बोल सत्य गमतात, गडे ! ॥ ३ ॥

होईल कीं, नच होईल दर्शन ?
जिवा-शिवाचें अखंड-मीलन ?
आशालतिका जाईल करपुन ?
हीच निराशा चित्तीं जडे ॥ ४ ॥

जाईन खालीं, पाय निसटुनी—
तर, जावो हा, देह भंगुनी
दर्शन अथवा मृत्यु, यांतुनी—
देइं, तुला जें मान्य, गडे ! ॥ ५ ॥

अनुक्रम २१२८४ दि:
क्रमांक १३५४३ नों: दि: २३/७/५

# कसें जगावें ?

कसें जगावें, जगीं जिवाला जळतांना पाहुनी ?
सांग रे देवा ! समजाउनी ?
कसें हसावें, निज हृदयाच्या शकलांना पाहुनी ?
सांग रे देवा ! संतोषुनी !
कसें म्हणावें, मंजुळ गाणें, फांस गळा लावुनी ?
सांगरे ! पुनः पुन्हां घोळुनी ?
निज आशेची, बाग पेटतां, शांतपणानें तिथें--
रहावें कसें उभें सांग, तें ?
परके खाती, अन्न पोटभर, पाहुनि त्यांचीं शितें--
चित्त कीं क्षुधिताचें तोषतें ?
सुवर्ण-चषकां मधुनी प्याला, गंगा-जल ही कुणीं--
शमे कां तृष्णा, तें पाहुनी ?
श्रीमंताचे ऐदी छोकरे, मोटारी उडविती--
सहावी दैना सुजनें किती ?
जनिं 'दयाळु' म्हणुनी डंका तव वाजतो !
मज कृती वांचुनी गमे परी, फोल तो !
तुज शरण पातलों चुके न परि भोग तो !
कसें जगावें निष्प्रेमाचें जीवन घेऊन जनीं ?
सांग रे देवा ! समजावुनी ?

# कसें पाहवत नाहीं

(१)

येतसे वसंतीं बहर आम्र-वृक्षाला
मोहिती मनोहर आम्रफलें चित्तांला
'पाडाचे-आंबे' पाडाया भू-वरतीं
किति दगड फेंकिती, स्वार्थी-जन त्या वरतीं।

(२)

'कोकील' काढतो पंचमांत मधु-सूर
या फसव्या-लोकांतुनी, जाउनी दूर
'शुक' रंगदार, पाहुनी तोषती नयन—
त्यां करुन ठेविती जन कां बंदिवान ?

(३)

'गुणवंत' कुणी निजगुणें मिळवितो मान
खल, टपून बसती करावया अपमान
उद्यमें कुणी, ऐश्वर्य मंदिरीं जातो
कुणि ऐदी अजागळ, विघ्न उपस्थित करतो

(४)

कुणि परस्परांतें सहाय करण्यां झटती
निज दोष झांकुनी कुणी तयातें हंसती
सौंदर्य, सौख्य, सत्प्रेम ज्या स्थळीं राही
ना. कळे जनां 'तें कसें पाहवत नाहीं'।

# स्वर्गही तुच्छ गमे त्यां पुढें

चला राजया! जाऊं आपण आपुल्या गांवाकडे।
स्वर्गही तुच्छ, गमे त्यांपुढें ॥
'मुंबईंत' या नको राहणें राबणेंहि दिन-भर।
मिळे ना, विश्रांति पळभर।
स्वातंत्र्याची, मीठ भाकरी, खाउं सुखानें घरीं।–
नको परी, परक्यांची चाकरी ॥
दिनभरीं दुज्याच्या तंत्रानें वागणें।
निज स्वातंत्र्याला आग स्वयें लावणें।
हें अपमानाचें हवें कशाला जिणें?
चला प्रेमला! जाऊं सत्वर, सुखें माय-भू-कडे।
स्वर्गही तुच्छ गमे तिज पुढें।
मळयांत पेरूं, गहूं, हरभरा, फुल-झाडें सुंदर—
लावुं फळझाडेंही भरपुर ॥
बहार येइल, फळा फुलांना, पिकेल गहूं हरभरा
सुखाचा येईल अनुभव खरा ॥
ओढ्या जवळीं, बसुनी खाऊं, 'ओंब्या', कधीं 'हरभरा'
बाजवूं पांवा मग सुंदरा!
मीं घेउन गोंफण पक्षी मग उडविन।
अन् माळोच्यावर बसुन करूं राखण।
झोंपडी आपुली बनेल नंदनवन!
आनंदाचें दिसेल तेथें, राज्य गडे! चहुंकडे।
स्वर्गही तुच्छ गमे, त्या पुढें।

# दयाळू देवा

तू 'दीन दयाळू' विभो म्हणविसी जनीं
तव विचित्र रचना, न, ये मला उमगुनी ॥धृ॥

नच फुलें दिलीं चंदनां !
नच सुगंध तो कांचनां !
तूं दिला, विषारी फणीस, कैसा मणी ? ॥१॥

दिधलीस संतती जिथें
अन्नाची वाण कां तिथें
श्रीमंत मुलांस्तव, कितीक झुरती मनीं ॥२॥

निर्दया - नारी नांदती
त्यां दिलेंस विभवां अती
किती झोपडींत, ढाळिती अश्रु, शालिनी ॥३॥

जे, श्रेष्ठ स्वतां म्हणविती--
दुर्बलां, अमित गांजिती
मोटार उडविती, गळे कितिक कापुनी ॥४॥

विद्वान, भूषविल कुलां--
सुखवील मातृ-भूमिला
त्यां दीन ठेवीशीं, मूर्खा करिशीं 'धनी' ॥५॥

तव कीर्ति प्रभू ! उज्वल !
मग असा कसा गोंधळ ?
ही विटंबना बघ, नेत्र जरा उघडुनी ॥६॥

# दर्शनोत्कंठिता

मी अयोग्य ठरलें, कैशी तुझ्या दर्शनां ?
देवा ! कैशी तुझ्या दर्शनां ॥ १ ॥

शुभदिन 'नवमी', मांगल्याची
पुण्य-स्मृति दे, तव जन्माची
गर्दी जाहली नर, नारींची
प्रभो ! तुझ्या दर्शनां ॥ २ ॥

पुष्प-हार बघ घेउन आलें
नेत्र दर्शनां, उत्सुक झालें
दारां जवळीं जों, न, पोंचलें-
केली, कुणी गर्जना— ॥ ३ ॥

"दूर भिकारिण, लाज न कैशी—
दारांजवळीं चालुन येशी
देवालय हें, का भ्रष्टविशी ?
भीति नसे कां मनां" ॥ ४ ॥

क्षणींच जिथल्या तिथें थबकलें !
शिरावरीं जणु अंबर पडलें।
भाव मनींचे मनीं विरमले
येती किती कल्पना ॥ ५ ॥

* * *

कर जोडुन मीं पुशिले त्याला—
"हीन-कुलीं आले जन्माला—
दोष यांत कां माझा बोला ?
दया करा, सज्जना !"— ॥ ६ ॥

"राम-प्रभु" हा सकल जनाचा
भेद-भाव त्या रुचतो कैचा ?
'पतितोद्धारण' 'बाणा' त्याचा
मिथ्या कीं, ही कल्पना" ? ॥ ७ ॥

शबरीचीं बोरें चाखियलीं।
प्रीति मर्कटांवरतीं केली !
'कलात' प्रभुची ! वृत्ति बदलली-
कैशी? कळे, ना मनां?" ॥ ८ ॥

"दया करा मज आंत येउं द्या-
डोळे भरूनी, रूप पाहूं द्या-
दुरून पदीं हा हार वाहुं द्या-
एका, जरा याचना" ॥ ९ ॥

* * *

उत्तर परी नच कोणी दिधलें।
दगड फेंकुनी तिला मारिलें।
मूर्छित पडतां बोल निघाले।
'तारी दिनोद्धारका !' ॥ १० ॥

# करपलेली कळी

कटु खेळ विधीचा, कीं लीला दैवाची?
करपली अकालीं कळी कशी जाईची? ॥१॥

नाजुकशी कलिका, डुले वायुसह मोदें
मच्चित्त तोषलें, तिला बघुन आनंदें ॥२॥

हांसली जरा उमलली, टवटवी आली
किति रसिक-भृंग घालिति गुंजि भंवतालीं ॥३॥

तें मुळीं न वाटे रूप जळुन जाईल
मातींत मिसळुनी मातेरें होईल ! ॥४॥

कुणि आग कधीं पाखडली तिजवरी?
कीं तुटून पडली बिजली तिजवरी?
नच कुणी करिल करुणा कां, तिजवरी?

किती रान-फुलें उमलतीं न गणती त्यांचीं!
करपली मनोहर पण कलिका जाईची? ॥५॥

# शुक्राचा तारा अजुनी उगवत नाहीं

पसरली निशा घनदाट निराशेची ही
शुक्राचा तारा अजुनी उगवत नाहीं ॥१॥

हृद्-कमलाच्या पांकळया कुणीं खुडियेल्या?
कुणिं तार वीनच्या तडा तडा तोडियल्या? ॥२॥

हांसणें, बोलणें, कसें लोपुनी गेलें?
ढांळणें निशिदिनीं अश्रु नशिबीं आले ॥३॥

भूवरीं दृष्टि खिळतसे सुटे निश्वास
दिसतसे कशी दुनिया ही सर्व भकास ॥४॥

उमलेल कळी हृदयाची, वद कधीं?
उगवेल प्रभा भाग्याची, वद कधीं?
बहरेल लता आशेची, वद कधीं?

ही निशा दुःखमय कैशी संपत नाहीं?
शुक्राचा तारा अजुनी उगवत नाहीं! ॥५॥

# भिकारीण

हातीं घेऊन झोळीला, येई भिकारीण दाराला
चिरगुट तें फाटकें अती लाज त्यांत लपवित होती
दारिद्र्याच्या चितेमधीं–
रूप-रंग जळुनी जाती !
येई म्लानता वदनाला
ग्रहण लागलें कीं शशिला ?
अश्रु ढाळुनी विझवित होती, आग हृदीं जी धगधगली !
फिरून पाहिलें, अवघ्या जगतीं, पूर्ण-परी न आशा झाली !

(२)

भीत भीत दारीं आली, दीन-वाणीनें मग वदली–
"आई ! भाकरी मज वाढा, पांग गरीबाचें फेडा–
उष्टे, तुकडे, शिळे जरी
असतिल द्या मज तेच तरी"
कुणीं, तुच्छतेनें हंसले
कुणीं गंजुनीया वदले–
"लाज नाहीं कां वाटत कसली ? भीक मागण्याला आली।"
फिरून पाहिलें अवघ्या जगतीं, पूर्ण परी न आशा झाली !

(३)

खिन्नमनें मागें फिरली, निराशतेची ती पुतळी !
ग्लासावर उडती ग्लास, चाले नर्तकिचा नाच

थबकुनिया बोले बाला-
" दादा! भिक्षेला घाला
द्याल जरी मुठभर अन्न-
त्यांत आमुचें कल्याण "
दान द्यावया कुणीं न उठलें, 'मैफिल' होती सजलेली!
फिरून पाहिलें, अवघ्या जगतीं, पूर्ण परी न आशा झाली!

(४)

स्वार्थमयी सगळी दुनिया, नाहीं कुणाच्या मनीं दया!
यौवनास पाहुन भुलती, दया विषारी दाखविती!
दारोदारीं बाजारीं—
फिरलें, न दिसे कैवारी
'दीनां' नच वाली जगतीं
कळ्या किती करपुन जाती!
मूर्च्छित पडतां, कोमल युवती अस्फुटसं ऐसें वदली-
"फिरून पाहिलें अवघ्या जगतीं, पूर्ण परी न आशा झाली!"

# चतुर नाखाडी

भरजलीं टाकिली 'नाव' गडे ! ॥ ध्रु ॥
निज ध्येयाचें शीड घेउनी
धैर्यरज्जुनें त्यास बांधुनी
दो-हातांची वल्ही करुनी
वल्हवीत ने नाव पुढें ॥ १ ॥

जलधीचा नच ठांव घेतला
कुठें खडक नच ठावें त्याला
प्रतिकुलतेचा वारा सुटला
तसाच जातो पुढें पुढें ॥ २ ॥

वादळ उठलें, सागर उसळे
लोक बोलती 'फिर माघारें'
'नाव टाकुनी पोहुन ये रे!'
चित्तीं न त्याच्या भीति जडे ॥३॥

भक्ति चिकाटी, कसा लागली
देवार्जाला करुणा आली
इच्छित ठायीं नाव पोंचली
प्रभा फांकली चोंहिकडे ॥ ४ ॥

★

# अशाश्वत जीवन

दो दिवसांचे जीवन जगतीं, घेई यश मिळवुनी
मानवा ! जाइं धन्य होउनी ॥ धृ. प. ॥

सत्ता, वैभव जयें, मिळविलें ऐसे सम्राट
तख्त, ताज, त्यजुनिया, शेवटीं मिळती मातींत ॥ मा. ॥

'शिकंदरा' सम पराक्रमी नरवीर किती झाले
रिक्त हस्त घेउनियां आले, आणि तसे गेले ! ॥ मा. ॥

कशास ठायीं ठायीं लाविशीं वनें बाभुळीचीं ?
परक्यां साठीं चिता पेटवुन, तींत स्वतां जळशीं ॥ मा. ॥

दीन जनांचें शाप, घेउनी शिरीं पाप भार
देवद्वारीं जाई त्याला शतधां धिक्कार ! ॥ मा ॥

# तयाचें गावें जगीं गुणगान

तयाचें गावें जगीं गुणगान
हिंदु मुस्लीम, असो कुणीही
असो विभूति महान् ॥ त ॥

सांसाराचा पाश तोडुनी विरक्त जो बनला
चिदानंदीं रंगुनी जयानें, वश केला भगवान ॥ १ ॥

लक्ष्मी ज्याच्या घरीं विलसते, दारीं गज डुलती
दीन-दयेनें द्रवुनी संपदा, अगणित करी जो दान ॥ २ ॥

निज धर्माची लाज राखण्या, अबलां ताराया
उडी संगरीं धांवत घेई, हांसत देई प्राण ॥ ३ ॥

मातृ-भूमिची हांक ऐकुनी, खडबडुनी उठतो
पांग फेडण्या भू-मातेचे, सुखें करी बलिदान
तयाचें गावें जगीं गुणगान ॥ ४ ॥

卐

# अमंगल दर्शन त्याचें जनीं

निज ब्रीद जाई विसरुनी
अमंगल दर्शन त्याचें जनीं ॥ध्रु॥

कुणि असो महा पंडित
शास्त्रार्थ शुष्क सांगत
परि वृत्ति हीन निशिदिनीं, अमंगल दर्शन त्याचें जनीं ॥१॥

मदना-सम सुंदर दिसे
जन 'कलावंत' म्हणतसे
दावी न ओज लेखणी, अमंगल दर्शन त्याचें जनीं ॥२॥

श्रीमंत कुबेरा परी
उडवितो नित्य मोटरी
धन वेंचि न सत्कारणीं, अमंगल दर्शन त्याचें जनीं ॥३॥

शूरत्व अंगि बहु जरी
परि द्रोह स्वामिशीं करी
शत्रुला मिळे जाउनी, अमंगल दर्शन त्याचें जनीं ॥४॥

मधु-वचें प्रीति दाउनी
करि घात, अंतिं फसवुनी
तो अधमाधम त्रिभुवनीं, अमंगल दर्शन त्याचें जनीं ॥५॥

निज ध्येयाला विसरला
धिक्कार असो त्याजला
भू-भार राही होउनी, अमंगल दर्शन त्याचें जनीं ॥६॥

# पण अंतीं

डुलतात चामरें, शिरीं कुणाच्या जगतीं
करुनियां हमाली कुणी फिरे भू-वरती ! ॥१॥

विलसतो कुणाच्या 'राजदंड' तो हातीं
घेउनी कुऱ्हाडी काष्ठें कुणिं फोडिती ॥२॥

कुणिं गाद्या, गिरद्या वरतीं, लोळत पडती
नच तरट फाटकें, मिळे कुणांला जगतीं ॥३॥

ऐश्वर्य कुणाच्या पायीं लोळण घेई
कुणिं अन्ना-वांचुन प्राण सोडुनी देई ॥४॥

हा सान, थोर हा, भेद मानवें केला–
फिरूनिया चक्र—दैवाच दावी लीला ॥५॥

भूपति, भिकारी, मृत्यूच्या सदनांत
पोंचती, अंतीं, मिळतात सर्व मातींत ! ॥६॥

# वठलेला वृक्ष

(१)

कुठल्याशा रानीं एक—वठलेला तरुवर होता, पाहिला
नच सुडौल शाखा दिसती-नच हिरवीं पानें होतीं, त्याजला
नच फुलें सुगंधित फुललीं—नच फल-भारानें होता, वांकला

पक्षी नच आश्रय घेती।
लतिकाही दूर सरे ती,
पांथस्त निकट नच येती।

'एकाकी' कंठी कालाला—वठलेला तरुवर होता, पाहिला

(२)

तरु-लता जवळच्या हंसती—हंसवुनी तयां हिणवीती, वाटलें
'कावळे' करुन 'कट्ठु कांव'— उपहास, तयाचा करिती, वाटलें
"सौख्याचे सगळे साथी"—अनुभवें बोल, त्यां साचे, वाटले

जीवन-रस सुकुनी गेला।
शुष्कता, येतसे तनुला।
नच 'वसंत' फुलवी त्याला।

लागला गमे झुरणीला—वठलेला तरुवर होता, पाहिला

(३)

कुणि कुऱ्हाड घेउन आला—अन् घाव तयाच्या मर्मीं, घातला
मग आनंदानें हंसला—चंदनीं गंध त्या रानीं, पसरला!
बाजारीं चढलें मोल—जन पुन्हां वर्णिती मोदें, त्यांजला!

मेल्यावर कळते महतिऽ।
बघुनियां अशी जन-वृत्ति।
धिक्कारुन त्यांना अंतीं।
तरु, 'मंगल-धामीं' गेला—वठलेला तरुवर होता. पाहिला!

# तेथें चल जाऊं

तेथें चल जाऊं, राजसा! तेथें चल जाऊं
नको अशा जनतेंत राहणें
मानभंग उपहास, साहणें
स्वात्म स्वरुपां जिथें पाहणें
तेथें चल जाऊं ॥ १ ॥

दूर दूरशा, असल्या प्रांतीं
दुष्ट-जनांची जिथें न भीती
जेथें वसते समता, शांतिऽ
तेथें चल जाऊं ॥ २ ॥

कल कल-नादें सरिता सुखविल
सुमनावलि निज सुगंध वितरिल
गुंजारव मधु मधुकर करतिल
तेथें चल जाऊं ॥ ३ ॥

लहान, मोठा, गुणी, अवगुणी
'सधन', 'अधन', हा भेद गणि न कुणीं
प्रीति देवीच्या, रम्य प्रांगणीं
तेथें चल जाऊं ॥ ४ ॥

मंगलतेचे सुटतिल वारे
मंगलता, भंवतालीं पसरे

द्वेष-दंभ छल, कपट ना उरे
तेथें चल जाऊं ॥ ५ ॥

नंदन-वन, होईल झोंपडी
स्नेह-जान्हवी वाहील दुथडी
तूं माझा, मी तुझी सोंगडी
तेथें चल जाऊं ॥ ६ ॥

## संभावित

या विशाल जगतांमाजीं कुणि नच आपुलें
हें शल्य विषारी हृदयीं होतें खुपलें ॥१॥

हृदयाचें होउन पाणी, अश्रु-सह वाही
जीवनांत भरुनी, घोर निराशा राही ॥२॥

मी गरीब होतें. हिंदु—गतधवा बाला
पोटार्थ. निघालें मजुरी मिळवायाला ॥३॥

कितिकांस विनविलें रडुनी धरुनी पाय
नच आश्रय मिळतां. निघे मुखांतुन 'हाय'! ॥४॥

मम करुणा आली, एक 'दयावंतास'
लाविलें तयानें, मजला गृहकार्यास ॥५॥

शिकलेले होते, होते ते धनवंत
मज दिसे खरा तो 'संभावित' जगतांत ॥६॥

दिन, कांहीं गेले, परिचय वाढत गेला
करुणेचा पेला, प्रेमरसानें भरला ॥७॥

सहवास तयाचा मजला सुखकर होई
तो म्हणे 'तुझ्याविण मजला करमत नाहीं' ॥८॥

मज भुरळ पाडली. गोड गोड बोलूनी
मच्चित्त गुंगलें त्याच्या मधु-तर वचनीं ॥९॥

मज वाटत होतें याचें मजवर प्रेम
तो धरीत होता, या हरिणीवर नेम ॥१०॥

मुखि दिसूं लागली गर्भिणिची नवछाया
तों, नष्ट जाहली त्या अधमाची माया ॥११॥
मज मार देउनी, घरांतून काढियलें
आकाश कोंसळुन गमे शिरावर पडलें ॥१२॥
पैशाचे मिंधे-लोक, तयासम वदती
'पापाचे पुतळे' मला 'पापिणी' म्हणती ॥१३॥
पातकी, बोलती मला 'जारिणी' 'कुलटा'
हा देवा! चाले खेळ कसा हा उलटा ॥१४॥
नच समाज दंडी, ऐशा चांडाळांना
देवही दावितो त्यांच्यावर कां करुणा? ॥१५॥
मजसम अबलांना, आश्रय कुणि नच देती
नच दया दाविती, पतितोद्धार न करिती ॥१६॥
एकाला शिक्षा, दुजा सुटे निर्दोषी
मानिती सभ्य-जन 'न्याय' असा हा 'दोषी' ॥१७॥
बलिदान असें अबलांचें जो घेईल
तो देश कसा उत्कर्षाप्रति जाईल? ॥१८॥
मी आश्रय घेते, गंगे! तव उदरांत
तो मिरविल 'संभावित' म्हणुनी जगतांत! ॥१९॥

★

## नेत्र उघड वा मीट—

(१)

ऊंच विशाल मंदिर, वर, सोन्याचा कळस
'घण घण' घंटा-नाद, लोक येती दर्शनास
दगडाची, पितळेची, मूर्ति कोरुनीया छान
हात, पाय, नाक, डोळे, केली, मानवा-समान

(२)

'दीन-बंधु' 'दीन-नाथ' लावुनीया विशेषण
भाविकांनीं बनवीलें, 'दगडास' 'नारायण'
रत्नजडीत मुकूट, शिरीं झळके सोज्वळ
गज-मौक्तिकांची माळ भूषवितें वक्ष-स्थळ

(३)

भरजरी, रेशमाचीं, वस्त्रें नवीं, नाना परी
उटी अंगास लाविती, चंदनाची वा केशरी
झोंपविती, ऊठविती, भक्त, करिती कौतुक
पाषाणाचा-देवराणा, स्थिर राही, होई मूक

(४)

पंच-पक्वान्नाचा तुला, नित्य नैवेद्य लागतो
क्षुधितांचा अंतरात्मा, अन्नावीण तडपतो

नाना परी बहुमोल, वस्त्रें तुज भरजरी
लाज झांकण्या दीनांस लक्तरेंही, नाहीं, हरी !

(५)

चन तुझी सर्वकाळ, चाले, चालेलहीं देवा !
आम्हां गरीबांस हेवा, कां न तुझा बा ! वाटावा ?
माय-बाप ! तुझे होती, सर्व सुखाचे सोहाळे !
ढाळीतात अश्रु पाही, तुझी दीन-दुःखीं बाळें !

(६)

शक्तिमान देवराया ! सत्य स्वरुपास दावीं
घेउनीया सुदर्शन, सर्व दुर्दशा नाशावी
ऐक निर्वाणीचे बोल, कान देउनीया नीट-
"विटंबना दूर करी. नेत्र. ऊघड वा मीट" !

# नवहिन्द निर्मिणाऱ्या

नवहिंद निर्मिणाऱ्या—माझा प्रणाम घेई ।
ही भक्ति-भाव सुमनें—वाहूं तुझ्याच पायीं ॥१॥

स्वातंत्र्य-स्वर्ण-दिन—हा-ये आज भारतांचा।
बापू ! त्वदीय स्मरणें—दाटून कंठ येई ॥२॥

रात्रंदिनीं श्रमोनी—देशास मुक्त केलें ।
परि 'राम-राज्य' रचना—तव ती अपूर्ण राही ॥३॥

'जातीयता मिटावी—माणूसकी पहावी'।
या ध्येय-पूर्ति साठीं—बलिदान प्राण देई ॥४॥

'शिकवी, न, धर्म लढणें—वा द्वेष, वैर करणें'।
धर्मास लांछवीते—सैतानि-वृत्ति पाही ॥५॥

'माणुसकी मनांत—माणुसकी कृतींत ।
माणुसकी जगांत—अवघ्या भरुन जाई" ॥६॥

होईल स्वर्गसम तें—निमिषांत सर्व जग हें ।
बलिदान 'बापुजीचें'—तेव्हांच सार्थ होई ॥७॥

卐

# धन्य माता

जियेचा पुत्र यश मिळवी-तयाची धन्य ती माता ।
दैन्य औदास्य जो पळवी-तयाची धन्य ती माता ॥१॥

हृदीं सत्‌शीलता वसते-मुखीं गंभीरता दिसते ।
गुणें जो मान्य पंडीतां-तयाची ... ... ... ... ॥२॥

जगाचा ताप वाराया-समर्पी संगरीं काया ।
हंसे शूळावरी चढतां-तयाची ... ... ... ... ॥३॥

जिथें दीनांस विश्राम-मिळे व्यथितांस आराम ।
असे, अबलांस जो त्राता-तयाची ... ... ... ... ॥४॥

भक्त जो माय भूमीचा-दास जो साधु-संताचा ।
स्वदेशां होइ आवडता-तयाची धन्य ती माता ॥५॥

## वसंतागमन

आला वसंतराजा वसुधेस हर्ष होई
श्रृंगार साज करुनी-ती स्वागतास येई ॥१॥

फुलला नवा फुलोरा-तरुराज डोलतात
पानें नवी गुलाली-पवनाशीं खेळतात ॥२॥

मधु-मालती फुले ती विश्वांत गन्ध भरला
कोकीळ गोड गानीं-किती आळवी प्रभूला ॥३॥

सकलांस हर्ष होई-ऋतुराज ये म्हणूनी
देवी वसुंधरा ही-पुलकीत होइ स्वमनीं ॥४॥

* * *

आशा तरु परन्तु-माझा वठून गेला !
नच पालवेल, तुझिया-करुणेविना, दयाळा ! ॥५॥

# कर आत्मनिरीक्षण—

आपुलेंच नाहीं निर्मळ घर आंगण
कां काढावी परक्यांची उकरून घाण ? ॥१॥

आपुलेंच नाहीं उदार अंतःकरण
कां हिणवावें म्हणुनिया कुणाला कृपण ? ॥२॥

आपुल्याच हृदयीं नाहीं समता, ममता,
कां दुसऱ्यांची बोंचते मनास विषमता ? ॥३॥

आपुलीच नाहीं मंगलमय मधु-वाणी।
कां इतरांचे अपशब्द झोंबती कानीं ? ॥४॥

पापांचे पर्वत रचिले, ते नच दिसती।
कां दोष दुज्यांचे अणुभर नेत्रीं खुपती ? ॥५॥

पुसुनिया डांबरां स्वयें स्वच्छ नच व्हावें।
कां उगिच कुणावर शिंतोडे उडवावे ? ॥६॥

कर आत्मनिरीक्षण वळवुनिया दृष्टीस
हो शुद्ध स्वतां, मग करी शुद्ध इतरांस ॥७॥

# कधीं विधवांचा काळ पालटेल ?

अहा ! पालटला काळ उकिरड्याचा
तिथें मांडव घातला विवाहाचा
परी हिंदूंच्या दीन, गतधवांचा—
कधीं नाहीं कां काळ फिरायाचा ? ॥१॥

कुणी झेंडूंच्या गुंफुनिया माला—
भक्ति-भावें वाहती चंडिकेला' ।
धत्तुराही प्रिय गमे पूजनाला
तुच्छ त्यांहुन कां असती खिन्न बाला ? ॥२॥

दगड पितळाच्या मूर्ति घडोनीया
तयांठायीं देवत्व' मानुनीया
नमिति भावें पण दीन-गतधवेला—
कुणि न करुणेचा लेश दावियेला ॥३॥

पिता, भ्राता, बघुनिया खिन्न होती !
सासुबाई वाग्बाण सोडितीती !
नित्य भाषा ही असे, नणंदेची--
'दुष्ट, चांडाळिण, हीन-नशीबाची' ! ॥४॥

एक वेळां 'गृहलक्ष्मि' म्हणुन जीतें—
'सुशिल' म्हणुनी सन्मानियले' तेथें'—

'नाथ' जातां, ती अशुभ कां गमावी ?
अमंगलता कां दर्शनांत यावी ? ॥५॥

जगीं आशा, उत्साह, तिला नाहीं !
जीवनांतिल आनंद, लया जाई !
तूंच देवा ! त्यजुनिया मौन, बोल—
कधीं विधवांचा काळ पालटेल ? ॥६॥

卐

## वीर रमणी....

पहा ही दुंदुभी वाजे-झणीं जा संगरीं, राया !
दुर्दशा दैन्य हटवाया-वैभवें देश नटवाया
अनीति, भीति, मिटवाया झणीं जा सगरीं राया ! ॥१॥

गमे या दुंदुभी नादें-दुःखि भू-माय बोलविते
सुपुत्रांनों ! त्वरें या, या,-झणीं जा संगरीं, राया ! ॥२॥

त्यजोनी गेह ते गेले-मित्र समरांगणीं आपुले
रुचे कां शांतता समया ?-झणीं जा संगरीं, राया ! ॥३॥

रिपूच्या रक्त-रंगानें-यशोध्वज आज रंगविणें—
कुलाची कीर्ति राखाया-झणीं जा संगरीं राया ! ॥४॥

जय, श्री, स्वर्ग, वा कीर्ति,-जयानें वीर मिळवीती।
जगां, तें शौर्य दावाया-झणीं जा संगरीं, राया ! ॥५॥

सु-वीराची मला 'कांता' म्हणो जन, हौस गुणवंता !
गडे ! मम हट्ट पुरवाया-झणीं जा संगरीं, राया ! ॥६॥

# तयाला कुणि कां तुडवावें ?

तयाला कुणि कां तुडवावें ?

वेलीवर जें फूल उमललें
मुदें हांसलें स्वैर डोललें
झंजावातें गळून पडतां
कुणि कां तुडवावें ? ॥ १ ॥

ऊंच ऊंचशा, विशाल गगनीं
चम, चम चमके तारा-राणी
धरणीवर ती तुटून पडतां
कुणि कां तुडवावी ? ॥ २ ॥

राज-मंदिरीं ध्वज सुयशाचा
फडके, मुजरा घे सकलांचा
समरीं अरिनें जिंकुन घेतां
कुणि कां तुडवावा ? ॥ ३ ॥

वक्षस्थळ भूषवि जी माला
कोमेजुन जातांच तियेला
फेंकतांच तिज, हंसतां हंसतां
कुणि कां तुडवावी ? ॥ ४ ॥

वैधव्याची कुठार पडली
निराधार जणुं लतिका गमली

अनाथ अबला करीं गवसतां
कुणि कां तुडवावी ? ॥ ५ ॥

दारोदारीं भटके वणवण
गमे विश्व ज्या भेसूर भीषण
अभाग्यांस ज्या मुळीं न त्राता
कुणि कां तुडवावें ? ॥ ६ ॥

निजध्येयाच्या-शिखरां वरूनी
पडला कोणी तोल जाउनी
करूनीया उपहास तयाचा
कुणि कां तुडवावें ? ॥ ७ ॥

द्या उचलोनी पडलेल्याला
अथवा, पडुं द्या तिथेंच त्याला
"देवाच्या दुनियेंत कुणाला
कुणि कां तुडवावें" ? ॥ ८ ॥

## मनांप्रति—

कां उदास बसशीं असा? गडे!
बा! खिन्नमनां! चल जरा पुढें!

तिमिराचा बघ पडदा फाडुनी
बाल-रवी ये हांसत गगनीं
गेल्या अवघ्या दिशा उजळुनी!
प्रभा फांकली चोंहोकडे! ॥ १ ॥

झंझावातें तुटुनी पडलें
घरटें जें कष्टुनी बांधलें
वेंचुन काडया, पुन्हां उभविलें
येती पांखरें घरांकडे! ॥ २ ॥

चटके बसती तीव्र उन्हाचे
लोट वाहती, अति घामाचे!
कृषिवल शिंपी जल रक्ताचें
ढीग पिकाचा, पुढें पडे! ॥ ३ ॥

'सह्याद्री' च्या उरां फोडिती
'हिमालया' वर चढुनी जाती
निसर्गास जिंकुनिया घेती
वीर चालले पुढें पुढें! ॥ ४ ॥

परिस्थितीचे बंध तोडुनी
आपत्तीशीं झुंज खेळुनी
जाइ, सुखाच्या वातावरणीं
हंसुनी, हंसवी जगां, गडे ! ॥ ५ ॥

# डोळे झांक

(१)

गुलाबाचें रम्य फूल, घेउनिया हुंगतात
काण अंतरींचे कांटे, पाहुनिया खिन्न होत ?

(२)

चारु छटा चंद्रमाची, विलोकुनी हर्षतात
कोण हृदयींचा दाग, देखुनिया दुःखी होत ?

(३)

वीचि-तरंग पाहुनी, प्रमुदित होई चित्त
सागराची खळबळ, कोण कधीं पाहतात ?

(४)

पंजरींच्या पोपटाचे, बोल ऐकून तोषती
झुरे 'वंदीवान' मनीं, कोण तयां देइ मुक्तिऽ ?

(५)

रम्य रूप, मृदु हास्य, जन-मन, वेधीतसे
हृदयाची तळमळ, कोण जगीं पाहतसे ?

(६)

जन सुखाचे लोलुप-सुखा साठीं जमतात ।
वघुनीया दु:ख भार- डोळे झांक' करतात !

## बुलबुलास —

बुलबुला ! कशाला गाशीं मंजुळ गाणीं ?
जा उडून, नाहीं साथ द्यावया कोणी ! ॥१॥

पसरली उदासीनता, किती भेसूर—
आक्रोश चालला, ये रुदनाचा सूर ! ॥२॥

पांढरें जाहलें कपाळ, वैभव लुटलें !
दुर्दैन्य-मेघ दाटले, छत्र हारपलें ! ॥३॥

साहणें जगाचा ताप, तेंवी उपहास !
कुणि वदोत कांहीं, काढणें न शब्दास ! ॥४॥

अबलांचें कापुन गळे सुखें मिरवावें।
कोमलशां कुसुमां सदा पदीं तुडवावें !
हा न्याय जगाचा तुला नसे बा ! ठावें !—
'सोनेरी पडद्या आड, कसाबी करणी'
जा उडून, स्वातंत्र्याच्या वातावरणीं ! ॥५॥

卐

# जगीं भामीनी, तीच धन्या खरी

(१)

जिचें भाल सद्भाग्य दावीतसे
दिव्य-पावित्र्य जेथें स्वयें बिंबलें ।
जिच्या नेत्रयुग्मीं विधीनें जणू--
प्रेम, औदार्य, दोन्हीं असें ठेविलें ।
मुखेंदु जिचा तोषवी लोचनां--
ताप नेई हरूनी जिची वैखरी ।
जिला पाहतां, शांति लाभे जिवाला--
जगीं भामिनी, तीच धन्या खरी !

(२)

जिचें शीर्ष सूज्ञांपुढें वांकतें
साधु, संतास सन्मान, दे जी सती ।
जिचें ज्ञान मोही बुधांच्या मनांतें
असे नम्र जी नित्य लज्जावती ।
जिच्या कीर्तिचा गन्ध आनंद देई--
रसज्ञां, सुगन्धें जशी कस्तुरी ।
जिला पाहुनी शांति लाभे जिवाला
जगीं भामिनी, तीच धन्या खरी !

(३)

जिचें हात अश्रु अभागी जनांचें--
पुसाया, सदा राहती तत्पर ।

अनाथास पाहून, व्याकूळ होई--
    दयेनें जिचें कोंवळें अंतर ।
करी दुर्बलांचा सु-सांभाळ जी
    रक्षि बाळांप्रति जैंवी मातेश्वरी ।
जिला पाहुनी शांति लाभे जिवाला
    जगीं भामिनी, तीच, धन्या खरी !

(४)

जिला पाहतां प्रश्न यावें मनीं--
    कीं, 'रमा' 'पार्वती' हीच 'वागीश्वरी'?
'मंदाकिनी', कल्पवेली', असे वा--
    असे, 'कान्हया'ची मधु-बांसरी ?
'यशोमूर्ति' कीं ही यशस्वी जनांची ?
    'शची' पातली काय ही भूवरी ?
जिला पाहुनी, शांति लाभे जिवाला--
    जगीं भामिनी तीच, धन्या खरी !

# श्री भारत जननी !

श्री भारत-जननी गे ! नमन हें तुजला
इतर देश जगी जगांत मोठे--
तरी तूं प्रिय मजला । ॥नमन॥

सत्वशील 'हरिश्चन्द्र' नृपासम
पुण्यशील श्री 'रघुवीरा' सम
श्री 'यदुवीरा' सम पुरुषोत्तम--
भूषविती तुजला... ... ... ॥न. १॥

पतिव्रता 'सावित्री', 'पार्वती'
शीलवती 'तारा', 'दमयंती'
'दुर्गादेवी', 'लक्ष्मी' चमकती--
तेजाच्या चपला... ... ... ॥न. २॥

वीरबाल 'अभिमन्यु', 'बभ्रु' सम
प्रतापशाली 'प्रताप' 'शिव' सम
स्वामिभक्त 'ताना' 'बाजी' सम--
दाविती शौर्याला... ... ... ॥न. ३॥

धर्मास्तव हांसत मरणारे
देशास्तव हांसत मरणारे
विश्वाला भूषित करणारे
वंदितात तुजला... ... ... ॥न ४॥

यशो-गान तव कवि-जन गाती
वीर आदरें तुला पूजिती
स्मृति राहो तव मदीय चित्तीं
विनती पद-कमला !... ... ॥न. ५॥

क्र. ८०९५

## राष्ट्र ध्वज

आमुचा तिरंगीं झेंडा, नभीं असाच फडकत राहो ।

देशाच्या संकटकाळीं ।
निज ऐश्वर्याची होळी ।
करूनी जे घेती झोळी ।

गुणगान त्यांचे गावो । नभीं असाच फडकत राहो ॥१॥

जे कारावासीं पडले ।
जे धारातीर्थीं लढले ।
जे सूळावरती चढले ।

ग्वाही तयांची देवो । नभीं असाच फडकत राहो ॥२॥

नरवीर-हिन्द-वीरांनीं ।
रणशूर महायोध्यांनीं ।
उभविलें जगीं ध्वज ज्यांनीं ।

हा साथ त्यांची देवो । नभीं असाच फडकत राहो ॥३॥

'केशरी' रंग शौर्याचा ।
'हिरवा' सुख, समृद्धीचा ।
'शुभ्र' रंग मानवतेचा ।

संदेश जगतां देवो । नभीं असाच फडकत राहो ॥४॥

चक्रचिन्ह झळके वरती ।
किति स्मृति त्या माजीं वसती ।
परचक्र वारण्यांसाठीं

हा 'चक्र' फिरवित राहो । नभीं असाच फडकत राहो ॥५॥

# फोल जीवित

भरलें अथांग पाणी-विस्तीर्ण क्षेत्र ज्याचें
पवनासवें प्रमोदें-वीचीतरंग नाचे
जल, क्षार-युक्त हरि ना तृष्णा तृषातुराची
कैशी कळेल महती-तच्चित्ति सागराची ? ॥१॥

जरूरी नसे जलाची-नच शेत पेरियेलें
कितिही अशा, अवेळीं गगनांत मेघ आले
गर्जूनिया तयांनीं घनघोर वृष्टि केली
कृषिकांस तोषदायीं वृष्टी न हो अकालीं ॥२॥

ग्रीष्मांत तप्त भास्कर, सकलांस ताप देतो
सौन्दर्य सृष्टि-सतिचें-अवघें लुटून नेतो
उष्मा असह्य होई-अस्वास्थ्य चित्ति माजें
तैं वृक्ष व्यर्थ गमती-पवनां न सोडिती जे ॥३॥

अगणीत द्रव्य आहे-विद्वान फार आहे
सत्ता करांत आहे-सामर्थ्य देहीं आहे—
व्यथितास सौख्य द्याया-सानंद जो न झटतो
जीवीत फोल त्याचें भू-भार सत्य हो, तो ! ॥४॥

★

# अपूर्णता

गाई गायका ! गीत एकदां गोड पुन्हां सत्वर
वर्षु दे, पीयूष भूमीवर ॥१॥

चंडोलासम घेइं भरारी लकेर मधु काढ ती
मनाला ओढ लागली अती ॥२॥

सतार, सारंगी, तंबोरा सांथ तयांची तुला
कशाला हवी कळे, ना मला ? ॥३॥

सांथी वांचुन बुलबुल-गातो, कोकिल-आलापितो
जगाला मोहिनीच घालतो ! ॥४॥

आनन्दानें रसिक डोलती ऐकुन स्वर माधुरी
जशी वाजवी हरी बंसरी ॥५॥

वसंत येतां, वसुंधरेची विषण्णता जातसे
गान तव मोद मनां दे तसें ॥६॥

तूं गात असावें मंजुळ आलापुनी ।
मी भान विसरुनी व्हावें पुलकित मनीं ।
यातना जिवाच्या विरून जाव्या क्षणीं ।
गान ऐकिलें जरी, तरी कां, उत्कंठा वाढते ?
कशाची अपूर्णता वाटते ? ॥७॥

२१२८८ ३१०५
१३५४३ २३.१२

## आठवण

ही तुझीच कांबळ म्हणुन आवडे भारी !
मी वारीन राया ! तिजवर दुनिया सारी ! ॥१॥

तूं दिली मला, राजसा ! फुलें तगरीचीं
अनमोल असे ती दौलत माझ्या घरची ! ॥२॥

तूं इथें बैसला, इथें चारिल्या गायी
नित् वनामंधि या दिसे नवी नवलाई ! ॥३॥

या शिळेवरी तूं बसुन वाजवी पांवा
मी गवळण 'राधा', तू 'गोपाल' दिसावा ! ॥४॥

तव शीळ ऐकुनी जावं आंबे-बनाला
तू हळुंच म्हनावं 'मैना शोधी राघूला' ! ॥५॥

* * *

जरि तुला, मला, लै दूर केलं दैवानं
इथं बसुन तुला आठवून, जीव सोडीन ! ॥६॥

## कैफियत

ऐकावें सूज्ञ जनांनों !-'गणिका'मी कैशी बनलें !
या सभ्य-समाजामाजीं-अपराधी कैशी ठरलें !
पापांचे पर्वत रचुनी-नरकाचें साधन केलें !

कुलवंत पित्याची दुहिता ।
कुलवंत पतीची कांता ।
कुलवंत सुताची माता ।

असुनिया कसें हें घडलें-गणिका' मी कैशी बनलें ? ॥१॥

मम बाळ सहा महिन्यांचा-असतां पति सोडुन गेले।
'अपयशी' म्हणोनी मजला-पति-सदन पारखें झालें !
बाळास रक्षण्यासाठीं-पर-दास्य सुखानें वरिलें !

मी हिंदु गत-धवा बाला ।
मग सौख्य कोठचें मजला ?
अग्नींत पडे सुम-माला !

दास्यत्व नशीबीं जडलें-गणिका' मी कैशी बनलें ? ॥२॥

जे मजला सहाय करिती-काळिमा लाविती त्यांतें ।
जे हितैषि माझे बनती-अति अधम गणिती खल त्यांतें।
कुणि आश्रय मज नच देती-भिउनिया लोक-निंदेतें ।

अबलांस न आश्रय देती ।
लव दीनोद्धार न करिती ।

नीतिचे स्तोम माजविती ।
प्रभुवरा ! कसें हें घडलें–'गणिका' मी कैशी बनलें ? ॥३॥

मज बाळासह पाळियलें–तेधवां एक गणिकेनें
'धंद्यांत' व्हावया प्रविण–शिकविलें नाचणें, गाणें,
भ्रमरा–सम, बहु–जन येती, मोहुनी रूप, गंधानें ।
कुलवंत, त्यांत किती होते !
गुणवंत, त्यांत किती होते !
धनवंत, त्यांत किती होते !
ते 'सभ्य' राहिले सगळे !–'गणिका' मी कैशी बनलें ? ॥४॥

卐

# आई

गेलीस माउली तूं-स्वर्गी रहावयाला
सोडूनिया जगांत-या दीन-बालिकेला ॥१॥

चिमण्या घरास येती-गोठयांत गायी जाती।
जाऊन देव-लोकीं-भुललीस काय मजला ? ॥२॥

शोधून नेत्र शिणले-बाहून कंठ सुकला
माते ! तुझ्या मनींचा कीं प्रेमभाव सरला ? ॥३॥

आई ! तुझ्या करांत-पीयूष दिव्य होतें
हा जीव गे ! भुकेला-पण ना मिळे मला तें ! ॥४॥

सदनांत ज्यां, सुखानें-बहु काल घालवीला
तुजवीण माय ! घर तें-वाटे स्मशान मजला ॥५॥

छाया तुझी निमाली-बसती अनंत चटके।
वैतागुनी जगांत, एकाकी जीव भटके ! ॥६॥

कौतूक थोर करिती-मिळते जगांत कीर्ति-
नाहींस तूं बघाया-पेटे चिता उरीं ती ! ॥७॥

विश्वासुनी कुणाच्या-ही मान ठेउं अंकीं ?
कोठें जिवास रमवूं ?-हे लोक पाप-शंकी ! ॥८॥

रेताड-जीवनाची-यात्रा असह्य होई
जल-बिंदु तो मिळे ना-करपून जीव जाई ! ॥९॥

कंटाळलें जिवाला-तुजपाशिं नेइं आई !
हा एक हट्ट धरला-पुरवावयास येई ! ॥१०॥

## गोड आठवण

रत्न-जडित ती काळी चादर, घेऊन अंगांवरी
पहुंडली शांत निशा-सुन्दरी

चोंचीमध्यें, चोंच घालुनी, इवलालीं पांखरें—
झोंपलीं, चित्तीं भीती नुरे

खालीं वरती, दिसे शांतता, भव्यताहि चहुंकडे
कुणाची चाहुल नच ये गडे !

प्रभात-वायु वाहूं लागला, अंगीं भरें कांपरें
स्वैर बघ शीतल-वारा फिरे

नभीं उदेली, हांसत, सुन्दर, चंद्रकोर सानुली
प्रभा त्वन्नेत्रिं तिची देखिली

जीवन-पृष्ठें, वाचित होतों, बसुनीया आपण
जगाचें भान सर्व विसरुन

कसलीहि जयाच्या तळमळ मनीं लागते ।
तो जागत असतो, जग जेव्हां झोंपतें !
ध्येयावर त्याची दृष्टि अचल राहते ।

तूं, मी, बसलों, नजर भिडउनी, एकच ध्येयाकडे
येइ ती, गोड आठवण गडे !

# पूजा

येशील देवराया !—तूं माझिया घराला
आशेवरी कधींचा—हा जीव टांगलेला ॥१॥

या झोंपडीस माझ्या—पद लाविलें पवित्र
अवघ्या दिशांत भरला—आनंद एक मात्र ॥२॥

फुलला हृदीं फुलोरा—उधळीयलीं फुलें तीं
हळुवार पाय टाकी—रुतुपतील कीं पदीं तीं ॥३॥

नयनीं निरांजनाची—तळपे अखंड-ज्योत
पंचारती कराया—व्याकूल जीव होत ॥४॥

संगीत-ज्ञान नाहीं—तुज आळवूं कशानें ?
चातुर्य लेश नाहीं—तुज तोषवूं कशानें ?

नयनांतुनी वहातीं—मोत्यें किती टपोरें
तूं राजहंस माझा—वेंचून घेईं सारे ॥६॥

नव-पुष्प शेज देवा !—तुजला कशास व्हावी ?
हृदयासनावरीं या—मूर्ति सदा असावी ॥७॥

चुकली असेल सेवा—कर गोड तूं तियेला
हा जीव वाहियेला—सर्वस्व पूजनाला ! ॥८॥

# आशा

(१)

कपाळावर ठेऊन एक हात
विछान्यावर ही तनु पडे प्रशांत
नेत्र मिटतां, तव मूर्ति पुढें येते
आणि आंदोलन मनीं सुरू होतें

(२)

तुझें हंसणें, हंसविणें घुमे कानीं
हृदीं उठती, पडसाद ते अजूनी
रुसावें मी समजूत तूं करावी
आणि स्वकरानें आंसवें पुसावीं

(३)

वृक्षहीना वेलीस सांवराया
मलुल पुष्पांवर तोय शिंपडाया
तार वीणेची तुटे सांधण्यांत
शीघ्रतेनें तूं गुंतविले हात !

(४)

"तेच कर होवो, छत्र दुर्बलांस
तेच कर देवो, दंड दुर्जनांस
तेच कर, शोभा वाढवो जगाची
हीच आशा मम मनीं वसे साची !"

# कर दिला

कर दिला राजसा, आज तुझ्या हातांत
मग भीति कशाची सांग मला जगतांत ? ॥१॥

बघ पथीं पसरले अनेक कंटक राया !
तूं समर्थ आहे तयां दूर साराया ॥२॥

जरि सोंसाट्याचा सुटे भयानक वारा–
नच जीव घाबरा होई तूंच सहारा ! ॥३॥

ही जीवन-नौका डगमग होतां बघशीं
तूं नाविक बनुनी पार कराया येशी ॥४॥

होतांच अंत, जर पाय चुकूनी पडतां
तूं तोल सांवरावयास दिधलें हातां ॥५॥

हा सोड पिंजरा, तोड बंधनें सारीं
चल उडून जाऊं, घेऊं गोड लकेरी ॥६॥

चल यशो-गीरीवर, हात धरूनी जाऊं
'मानव-धर्माची' ग्वाही जगाल देऊं ॥७॥

# चांदणें

रम्य चांदणें पडे भू-वरी, शुभ्र दुधाचे परी।
बैसलों आपण सौधावरी ॥१॥
निळसर शालू जरीबुट्यांचा लेउनिया यामिनी।
जातसे अमृत कीं शिंपुनी ? ॥२॥
वसुंधरा या पीयूष-पानें, शांत जणूं जाहली।
शांतता भरली अवघ्या स्थलीं ॥३॥
तारा-बाला चंद्रासंगें, लपंडाव खेळती।
फेर कीं धरुनीया नाचती ? ॥४॥
ढगाआड लपुनीया बसला, गगनींचा चंद्रमा—
पाहुनी तुझा वदन-चंद्रमा ! ॥५॥
आजवरी पाहिलें चांदणें, अनेक वेळां जरी
खुमारी न्यारी आजची परी ! ॥६॥
गुलाब फुललें तुझ्या कपोलीं, कुंदकळ्या विकसल्या।
चांदण्या तेणें त्या चमकल्या ! ॥७॥
अंकावर मम मान ठेउनी शांत सखे ! पहुडली।
'नळाची' 'दमयंती' भासली ! ॥८॥
मी सेवित होतों स्वर्गसुखां, सुंदरी !
तूं पाहत होती दृष्टि किती लाजरी।
ना कळे कोणती भरली जादुगिरी !
सखे चंद्रिके ! तव हास्याचें, नित्य पडो चांदणें—
मला मग काय जगीं या उणें ? ॥९॥

# माझी नाव पडे दरियांत

माझी नाव पडे दरियांत ग ! दरियांत ग ! दरियांत ग !

अथांग सागर पुढें पसरला
पाहुन दुबळा जीव थरकला
चोंहीकडे अंधार दाटला

होइ मती, भयभीत ग ! भयभीत ग ! भयभीत ग !
माझी नाव पडे ॥१॥

ऊंच ऊंच किती लहरी येती
शीड तुटूनी पडे खालती
वल्हविण्याची शक्ति न हातीं

अश्रुंची बरसात ग ! बरसात ग ! बरसात ग !
माझी नाव पडे ॥२॥

कोणी वदती, येई इकडे'
म्हणती कोणी 'जाई तिकडे'
इष्ट मार्ग दृष्टीस ना पडे

भ्रांति भरे चित्तांत ग ! चित्तांत ग ! चित्तांत ग !
माझी नाव पडे ॥३॥

संकट समयीं कुणा पुकारूं ?
फुटली नौका कशी हकारूं ?
जीवन-धन कवणावर वारूं ?

कोण सखा? जगतांत ग! जगतांत ग! जगतांत ग!
माझी नाव पडे ॥४॥

देवो प्रभु तो हात दयेचा
निश्चल तारा तोच ध्रुवाचा
तोच असे आधार जिवाचा

दुनियेच्या दरियांत ग! दरियांत ग! दरियांत ग!
माझी नाव पडे ॥५॥

## क्षणांपूर्वी

(१)

क्षणांपूर्वी ज्यां गृहीं हर्ष खेळे।
क्षणांपूर्वी ज्यां गृहीं सौख्य लोळे।
आज सदनीं त्यां बोंचतात कांटे!
रवी जातां अंधार घोर दाटे!

(२)

क्षणांपूर्वी जें फूल फुलत होतें।
वायु-संगें डौलांत डुलत होतें।
कुठें त्याची टवटवी सर्व गेली?
किती भीषण म्लानता तयां आली!

(३)

क्षणांपूर्वी आलिंगुनी तरूला।
वल्लरीला आनंद फार झाला!
तुटे तरुपासुन, लता पडे खालीं।
वियोगानें करपून किती गेली!

(४)

क्षणांपूर्वी कोकिला गात होती।
तेंवि गगनीं स्वच्छंद जात होती!
पंख तुटले येऊन पडे खालीं।
अंतराळीं स्वर-माधुरी निमाली

(५)

क्षणांपूर्वी जो चंद्र हंसत होता !
अमृताची खैरात करित होता !
निराशेचें ढग घेऊनिया आले ।
तयें विधुचें निस्तेज वदन झालें !

(६)

क्षणांपूर्वी जे हीरका समान ।
नेत्र हरिणीचे चमकलेंत दोन ।
अहा ! अश्रु ते अमित ढाळताती: ।
मिळुन त्यांची मातींत होई माती !

(७)

ध्येय-पूर्तिअन् प्रेम-पूर्ति ज्यांत ।
जीवनाचें स्वारस्य वसे ज्यांत ।
चिदानंदीं त्या प्राण विलीन होवो !
'क्षणांपूर्वी' वदणें न दैवीं येवो !

# तुझ्या प्रकाशांत

तुझ्या प्रकाशांत राजया ! तुझ्या प्रकाशांत
मी जाईन दुर्गम जीवन-पथ, हा,—
राया ! उजळीत ।

हा जीव किती तळमळे
नच शांति तयाला मिळे
पाण्या विण मासा, जसा, तशी हो तळमळ चित्तांत ! ॥१॥

किति धर्म, पंथ, हे नाना
लव ताळमेळ नच त्यांना
रुढीची बेडी, सकल जनांच्या, पडली पायांत ! ॥२॥

'अद्वैत-वाद' कुणी गाती
कुणि 'द्वैत-वाद' मिरवीती
सोनेरी-पडद्या आड, कृष्णता लपली जगतांत ! ॥३॥

प्रेमीस, 'पातकी' म्हणती
पातकी 'सभ्य' म्हणविती
पापांत पुण्य गुरफटें, पुष्प जणु पडलें चिखलांत ! ॥४॥

नच इथें थांबवें जरा
हा जीव होइं घाबरा !
नच, ऊच्च, नीच, हा भेद वाटतें जावेसें तेथं ! ॥५॥

काळोख जरी चहुंकडे
अति बिकट वाट ती पुढें
पाऊल उचललें चालत आईन, तशीच तंद्रींत ! ॥६॥

दीपका घेउनी करीं—
चल जाऊं राजया ! दुरी—
येतील पांथ, जे मार्ग विसरलें, तुझ्या प्रकाशांत ! ॥७॥

राजया ! तुझ्या प्रकाशांत !

卐

# जाऊं दे अति दूर

मजला जाऊं दे अति दूर !
शांति मिळे ना, इथें जिवाला
माजे हृदीं काहूर ! ॥म.॥

भेद-भाव, छल, कपटें, भरलें
मानव; मनुजां खाया उठलें
दया क्षमेचें, कुठें लोपलें
न कळे, मंजूळ सूर ? ॥१॥

वृथा बढाई, निज धर्माची
सहिष्णुता नच परधर्माची
'मानवता' विसरुनी बनविलें
जगतां किती भेसूर ! ॥२॥

सबलानें, अबलांस छळावें
मत्त गजें, मुंगीस तुडवावें
ज्यांनीं श्रमावें, त्यांनीं मरावें
बघुनी फाटे ऊर ! ॥३॥

भाऊ भाऊचे गळे कापिती
स्वार्था साठीं लढुनी मरती,
कहर माजला, जगीं वाहती
रक्ताचे अति-पूर ! ॥४॥

पर-दास्याचा पाश झुगारुन
बंध रुढीचे पळांत तोडुन
मनांत येतें, उडुनी जावें
स्वार्थी-जगांहुन दूर ! ॥५॥

हसतिल कोणी, रुसतिल कोणी।
निंदिल कोणी वंदिल कोणी !
माणुसकीचा खरा पुजारी
सुरांत मिळविल सूर ! ॥६॥

'मानवतेचे' 'मंगलतेचे'
राज्य जिथें 'समता', 'शांतीचे'
नको आडऊं प्रेमळ जीवा !
जाऊं दे अति दूर ! ॥७॥

★

# चल उचल पाउलें भराभरा

चल उचल पाउलें भराभरा
नच विलंब लावी, करी त्वरा ॥ च ॥

प्रवास करणें सुदूर तुजला
ऊंबरठा अजुनी न सोडीला
हात लाउनी निज शीर्षाला
घालतोस सदनीं चकरा ॥ च १ ॥

प्राचीचा पट दूर सारतो
पश्चिमेस उल्लघुन जातो
सकल जगाला, प्रकाश देतो
पळ न विसांवा प्रभाकर ॥ च. २ ॥

अखंड फिरते वसुधामाई
भार जगाचा अवघा वाही
दया क्षमेचीं गाणीं गाई
रात्रंदिन धरूनी फेरा ॥ च. ३ ॥

जुनें पुराणें वस्त्र फेकुनी
धैर्याचे घे कवच चढुवनी
भूत-भयाचें टाक गाडुनी
भरकस पाउल ठेव जरा ॥ च. ४ ॥

रूढीवादी हंसोत, हंसतील
पूंजीवादी रुसोत. रूसतिल
मानवतेची दीक्षा घेउन
घाल उडी, समरीं वीरा॥ च. ५॥

उच्च, नीच, हा भेद घालवी
नर-रक्ताचा, पूर थांबवी
शांति, अहिंसा, दया, क्षमेचा—
ध्वज फडकूं दे दिगंतरां॥ च. ६॥

'समी-करण अवघ्या धर्मांचे—
करून, विनाशी, बंध रूढीचें
घुटके पाजी मानवतेचे
हंसवी व्यथिता वसुंधरा' ॥ च. ७॥

जागुन जगतां, दे ललकारी
शांतीचा हो अचल पुजारी
उचल पाऊलें, फिर विश्वांतरीं
पळ न घालवी, व्यर्थ जरा॥ च. ८॥

# मधुर मीलन

तयांचे जीवन हो शांत
मधुतर मंगल मीलन ज्यांचे
घडवी भगवंत ॥ तयांचे ॥१॥

उल्लंघुनिया कडे कपारी
ओलांडुनिया पथ कांटेरी
धांवत धांवत जाई सरिता
मिळे सागरांत ॥ तयांचे ॥२॥

लोखंडाचा हिणकस तुकडा
परीस-स्पर्शें, सुवर्ण झाला
तेज़ दिव्य नव मिळे तयां, ये
महती, जगतांत ॥ तयांचे ॥३॥

गारगुटी, लोखंडी, काडी
घेउन हातीं, चकमक झाडी
तेजाचे कण उधळी दावी
प्रकाश, तिमिरांत ॥ तयांचे ॥४॥

विशाल नभ आलिंगी महिला
आत्म-समपण करि ती त्याला
क्षितिजा-वरुनी जाति उभय ते—
धरुनीया हात ! ॥ तयांचे ॥५॥

घाण पाणी, गंगेंत सोडलें
स्पृश्याला, अस्पृश्य मिळालें
निर्मळ-जीवन घेऊन, जाती
आक्रमीत पंथ ॥ तयांचे ॥६॥

भिन्न धर्म, गुण, जाति, दिसते
सुखद तयांचें मीलन होते
विधिची घटना, घडुनी जाते
पडते जरि भ्रांत ! ॥ तयांचे ॥७॥

# अशी उदासीनता सोड गडे

झणिं उदासीनता सोड गडे
चल पुन्हां फुलवुं फुलबाग गडे !

अभ्राच्छित विधुसम मुख दिसतें
पाहुन मम मन करपुन जातें
रम्य पूर्णिमा आणुं गडे ! ॥१॥

बुलबुल प्यारा बोलत नाहीं
तिळतिळ काळीज तुटते पाहीं
घेई लकेरी गोड गडे ! ॥२॥

रिमझिम रिमझिम पडती धारा
सुटला शीतल मंजुळ वारा
रोमांचित तनु होइ गडे ! ॥३॥

हिंदोल्यावर बसुनी गाऊं
आम्रफलें ही मधुतर खाऊं
हास्य पसरवूं चौंहीकडे ॥४॥

कशास उभयां बंध जगाचे ?
आपण पक्षी प्रेम बनाचे
ऊंच उडूनी जाऊं गडे ! ॥५॥

रजनी राणी सोडून गेली
उषा-मंगला हांसत आली
गीत प्रीतिचें गाऊं पुढें ॥६॥

## प्रतीक्षा

अनुक्र: 29268 दि.
क्रमांक 93483 .. नं: लि:

वाट किती पाहू पाहूं वद राया !
यावया उशीर कां सखया ! ॥१॥

नेत्र हे शिणले, कां न अजुन येती
तयांतुन दंव-बिंदू झरती ॥२॥

जातसे आंत, आंतुन बाहरे
येउनी बघते चौफेर ॥३॥

चालले पक्षी, पक्षी घरट्यांत
गोड ये किलबिल कानांत ॥४॥

येतसे कपिला 'हम्मा' ही करीत
घेउनी अमृत पान्ह्यांत ॥५॥

जाहली लाल, पश्चिमची राणी
रवि करी जाऊन आळवणी ॥६॥

लागले दीप, दीप मंदिरांत
माझी कां म्लान सांजवात ? ॥७॥

रात-राणी ही फुलली बगिच्यांत
'राणी' तव खिन्न महालांत ॥८॥

ओढ नच लागे, घरची कां राया!
लोपली अवधी कां माया ? ॥९॥

\+ \+ \+

कुणावर खिळली साजणिची नजर ?
सांवरी लाजुन कां पदर ? ॥१०॥

# निरोप दे

वद किती कथूं मी तुला
सखे ग ! निरोप देई मला

नभिं नव-प्रभा फांकली
दुंदुभि पहा वाजली—
किति विलंब हा जाहला
सखे ग ! निरोप देई मला ॥१॥

अश्रु कां ढाळिसी असे ?
वद कुठें लोपलें हंसे ?
येइं कां कुशंका तुला ?
सखे ग ! निरोप देई मला ॥२॥

क्षणिं रणांगणीं जाईन
वधुनिया अरिस येईन !
जगिं करूं विभूषित कुलां
सखे ग ! निरोप देई मला ॥३॥

जय, लक्ष्मि, सर्वे आणिन
सखि ! तुझ्या पदीं वाहिन
कथितसे सत्य मी मुला
सखे ग ! निरोप देई मला ॥४॥

हें रडें जरा आवरी
करि दृष्टि पुन्हां हांसरी
करि सैल प्रेम ग्रंथिला
सखे ग ! निरोप देई मला ॥५॥

तूं खचीत वीरांगना
उत्साह देइं मन्मनां
तूं स्फूर्ति-देवता मला
सखे ग ! निरोप देई मला ॥६॥

तैं आरति ओंवाळली
अश्वास टांच बैसली
वळुनिया पुन्हां बोलला—
"सखे ग ! निरोप देई मला !" ॥७॥

# निज देशासाठीं लढले

१

भारतीय जागे झाले  निज देशासाठीं लढले
माय-भू रक्षणासाठीं  रणरगीं रंगुन गेले
संग्रामीं रिपुला वधुनी  अजरामर होउन गेले

त्या अमर देशभक्तांची
त्या चिरंजीव वीरांची
त्रिभुवनांत कीर्ति त्यांची

इतिहासीं गाजुन गेले  निज देशासाठीं लढले

२

होऊन लुटारू कोणी  ऐश्वर्य लुटाया येतो
पापग्रह बनुनी कोणी  स्वातंत्र्य रवीला गिळतो
कुणि दावानल होउनिया  देशांत आग पसरीतो

शांतता लयाला जाते
दारिद्र्य कपाळीं येतें
आक्रंदन जनता करते

तैं योद्धे धांवुन गेले  निज देशासाठीं लढले

३

अन्यायी शासनकर्ते  सर्वदा अनाथां छळती
चहुंकडे सडे रक्ताचे  निर्दयें शिंपिले हातीं

जणुं फुटे हृदय वसुधेचे  चिळकांड्या भंवतीं उडती
रणगाडे चालुन येती
तोफांचे गोळे सुटती
वरूनियां वांब ते पडती
नच वीर रेसभर सरले  निज देशासाठीं लढले

४

पश्चिमें मारिली हांक  होकार दिला पूर्वेनें
दोस्तिचा पुढें कर आला  घेतला करीं प्रेमानें
देशभक्त देशासाठीं  धांवले रणीं वेगानें
सति पतीहीन किति होती
बालकें पोरकीं होतीं
वृद्धांच्या काठया तुटती
काहूर भयंकर उठलें  निज देशासाठीं लढ़ले

५

'फ्लँडर्स' युद्ध भू-वरती  'शार्दूल' हिंदचे गेले
त्यां मदांध जर्मन वीरा  संग्रामीं जर्जर केलें
'फ्रान्सची' लाज राखाया  निज प्राण पणां लावियले
जाऊन अघाडी वरत
'केरेन' लढवुनी येती
'ट्युनिशिया' जिंकुनी घेती
तुमचेच वंधु ते सगळे  निज देशासाठीं लढले

६

राक्षसी महत्वाकांक्षा नच अरिची अजुनी शमली
अगणीत आहुती पडली सूडाची आग न विझली
कंट्रोल पोटीं चिमटा घे अंगावर चिंधी नुरली
वंगाल होत कंगाल
जनतेचे होती हाल
ठाकला काळ विकराल
तरि वीर संगरीं गेले निज देशासाठीं लढले

७

नरवीर रणीं जे गेले कर प्रभो! यशस्वी त्यांना
जे धारातीर्थी पडले इतिहासा! विसर न त्यांना
जा उठा, आर्य वीरांनो! करण्यास साह्य वंधू ना
तुम्हीं छावे नरसिंहाचे
प्यालांत दूध सिंहिणीचे
दाखवा तेज शौर्याचे
कवि वदे धन्य नरवीर निज देशासाठीं लढले

# शुकास

जा शुका उडुन सत्वरीं, तुला ना तरी, लोक धरतील,
मग पिंजऱ्यांत तुज बंदिवान करतील ॥१॥
पाही रे ! जरा भोंवतीं, आज जन किती, इथें हे जमले,
तुज बद्ध करोनी न्यावयास हे सजले ॥२॥
बा तुझा, रंग गोजिरा, विहंगमवरा ! चोंचही लाल,
कविजनां लागुनी रंजवीत बहुसाल ॥३॥
सुन्दरा ! तुझी मधुगिरा, मदीयान्तरा, मोहिनी घाली,
गमतसे अवनिवर अमृत-वृष्टि झाली ॥४॥
सोडुनी, भयद काननां, पाहुनी जनां, वसति तूं केली,
तैं तुला वाटलें 'असे दुर्दशा सरली' ॥५॥
तैं बंदिवास कल्पना, चुकुनिया मनां स्पर्शली नाहीं
म्हणुनिया यावयाची केलिस कां घाई ? ॥६॥
रूपाचे वैरी जन, तुला पाहून धरून नेतील,
निज सुखांस्तव, तुला बंदिवान करतील ॥७॥
जोंवरी बोल तव गोड, सुखाची जोड, तयां देतील,
तोंवरी तेहि तव समाचार घेतील ॥८॥
देतील फळें खावया, तोय प्यावया सुनिर्मल तसें,
जाशील विसरूनी दुःख बंदिवासाचे ॥९॥

लोपतां, परी नविनता तुझी चारुता न त्यां रमवील,
आंसवें ढाळुनी रुकनियां मरशील ॥१०॥

जरि जाशिल स्वजनांकडे तेहि कटु गडे! बोल वदतील
तुजकडे चुकूनी ढुंकुनी न बघतील ॥११॥

हा कपटाचा बाजार, असे संसार, तुला वाटेल,
अनुतापें शतधां हृदय तुझें फाटेल ॥१२॥

ती टाळाया दुर्दशा, सु-समयीं अशा, भरारी घेई,
तव नाश व्हावयांपूर्वि च सावध होई ॥१३॥

या फसव्या लोकांवर, नको क्षणभर, ठेवुं विश्वास
जा उडून, दुसरा घेण्यापूर्वी श्वास, ॥१४॥

पूर्वि चें भयद वन तुझें सुखाचें सदन खचित होईल,
स्वातंत्र्य सौख्य तुज वनश्रीच देईल! ॥१५॥

# दुर्मिळ दर्शन

प्हीला न वारा, थंडी, पाऊस, ऊन
दिनरात बैसलों तुझ्यांत मन लावून ॥१॥

घेतला छानसा धवल दगड निवडून
मनिं ध्यास लागला मूर्ति छान घडवीन ॥२॥

जेवलों अवेळीं, वामकुक्षि नच केली
ठेविलां न वहुधा, छिनी, हतोडी खालीं ॥३॥

कोरिली साजिरी सुबक मूर्ति मनहारी
'श्री राम' बनविला धनुर्बाण करिं धारी ॥४॥

रचितसे विधाता जेंवि सकल सृष्टीला
साकार तसें मी केलें किति दगडांला ॥५॥

'श्रीराम' 'लक्ष्मण' 'सीता' यांच्या मूर्ति
जाहल्या रम्य अति, पसरे ऐशी कीर्ति ॥६॥

मनिं विचार आला तदां एक धनिकाच्या
श्रीराम प्रभूचें मंदिर बांधायाचा ॥७॥

कापीले गळे कितीकांचे व्याजापायीं
तो डाग धुवाया उपाय हा मनिं येई ॥८॥

प्रस्थापित झाल्या मूर्ति चढला साज
पातलों दर्शनां आतुर होऊन आज ॥९॥

माळ्यास मनाई; रचिली बाग पहाया
मज बंदी जाहली. तशी मंदिरीं जाया ॥१०॥

दगडास कोरूनी बनवी, जो 'प्रभुराय'
'अस्पृश्य' होइ तो केंवि ? जगाचा न्याय ? ॥११॥

आंसवें वाहती हृदयीं पडतो पीळ
वद प्रभो ! आम्हां कां दर्शन तव दुर्मीळ ॥१२॥

# चुकतील कधिं या यातना

(१)

शुक पंजरीं डांबीयला
स्वातंत्र्य प्रिय ज्याला असे
स्वजनांतुनी दूरावला
अति आंसवें ढाळीतसे
नच खाइं तीं मधुतर फळें
जल बिंदु नच प्राशीतसे

ही लागली झुरणी मनां—
'चुकतील कधिं या यातना ?'

(२)

हतभागि कुणि कैदेंत तो
किति यातनांना सहतसे
भेसूर, भीषण, त्यां निशा—
जागूनिया कंठीतसे
निश्वास सोडुन वदतसे—
'तुज माय-भू ! मुकलों असें

ही लागली झुरणी मनां
चुकतील कधिं या यातना ?'

(३)

सोडूनिया निज जन्म-भू
'मुंबापुरी' ही पाहिली
बी.ए.त झालों पास, तेंवी
बक्षिसेंही मिळविलीं
फिरलों किती किति अर्ज केले
नोकरी नच लागली—
ही लागली झुरणी मनां—
चुकतील कधि या यातना!

(४)

दृढ-शृंखला किति रूढिची—
नच तोडतां ही तुटतसे
हे जातिचें खुळ माजलें
किति कष्टि जीवन होतसें
युवकां न इच्छीत वधु मिळे—
लज्जावतींना पति तसे
ही लागली झुरणी मनां
चुकतील कधि या यातना?

卐

# कशी ग! मीं पेटवुं ही पणती?

कशी ग! मी पेटवुं ही पणती ?
काळी काळी घोर अमावस
तिमिर किती भंवतीं ! ॥ क. ॥

घुबडांचा घुत्कार चालला ।
श्वान साथ दे रुद्नें त्याला ।
निशाचरांचा मेळा भरला ।
भय वाटे चित्तीं ॥ क. १ ॥

जणूं लागलें ग्रहण रवीला ।
दिवसांही काळोख पसरला !
काळ्या बाजारांत दाटला—
हो लयलूट अती ॥ क. २ ॥

धनिकानीं निर्धनां लुटावें ।
अबलांना सबलें शोषावें !
दारिद्र्याच्या यज्ञ कुंडि या—
पडती किति आहुती ॥ क. ३ ॥

देशि-विदेशीं अवघ्या जगतीं ।
हिंस्त्र-पशू सम, मानव लढती ।
नाशिवंत 'भू-तुकड्या साठीं'—
'दानवता' वरिती ॥ क. ४ ॥

अणू-बाँब ते धडधड पडती ।
शोणित सरिता भरून वाहती ।
'कोरियनां' सम किती अभागी—
प्राण-ज्योति विझती ! ॥ क. ५ ॥

"मानव" हिंसक शोध लावितो
अत्याचारी पाशवि बनतो ।
जर्जरितांनों ! अश्रु जलें या—
मिळेल कां शांति ? ॥ क. ६ ॥

मानव भुललें, माणुसकीला ।
अंतरांत अंधार दाटला !
प्रेमाची मंजुळ भूपाळी
कां नच आळविती ? ॥ क. ७ ॥

मम हातीं इवलीशी पणती
स्नेहें भरली, दीप-ज्योति ।
घन-अंधारीं-झंझावातीं—
दाविल तेज किती ? ॥ क. ८ ॥

★

# 'महात्मा' गेला

'महात्मा' गेला--हा देश पोरका झाला
दुःखद वार्ता जेव्हां कळली।
हृदयाला जणुं गोळी भिडली।
चरचर काळिज कापित गेली।
जिव्हारी बसला—हा घाव मिटे ना असला ॥ १ ॥

'तिलक', 'गोखले' 'सुभाष' गेले
'मोतीलाल' 'टागोरही' लपले।
काळानें त्यां ओढुन नेलें।
परी, पापात्मा—हा काळ होउनी आला ॥ २ ॥

कुंपणेंच शेतां नाशावें।
बिंदूनें अब्धिस शोषावें।
मषकानें सिंहास वधावें।
डाग लावियला—दुष्टानें निज देशाला ॥ ३ ॥

दिव्यत्वाचा सूर्य लोपला।
शीतलतेचा शशि मावळला।
चहूंकडे अंधार दाटला।
भीषण काळा—जाईल कधीं विलयाला ॥ ४ ॥

पुण्याईचें छत्र हरपलें।
गमे सर्व जग उघडें पडलें।

चटके बसतिल, कितीक बसलें ।
फुंकायाला—आतां न 'महात्मा' उरला ॥ ५ ॥

बलाढ्य सत्तेला प्रतिकारिल !
जाति जातिचे वैर निवारिल !
मानवतेचा धर्म आचरिल !
वंद्य जगताला, शांतिचा, पुजारी गेला ॥ ६ ॥

रक्ताचा नच थेंब सांडिला ।
'स्वराज्य' मिळउन दे, देशाला ।
आणि दिपविलें सर्व जगाला ।
'येशु', 'बुद्धाचा'—अवतार, आज हा सरला ॥ ७ ॥

कितीक जन्माची पुण्याई—
थोर 'महात्मा' जन्मा येई !
परमेशाची देण्या ग्वाही !
सौभाग्याचा हा—तिलक, सुमंगल पुसला ॥ ८ ॥

परी, शाप हा जांचिल सकलां ।
देशानें जरी बदला दिधला ।
प्रायश्चित्त न, या पापाला ।
दाग हा असला-नच शक्ति कुणा पुसण्याला ? ॥ ९ ॥

'अजानुबाहु' कृशांग मूर्ति ।
डोळ्यांपुढतीं फिरे सदां ती ।
विझेल कैशी ज्योत, जागती
अशा विभुतीला-विसरेल कसें जग बोला ? ॥ १० ॥

जनता रडते धायीं धायीं ।
पण, 'मोहनजी' बोलत नाहीं ।
हंबरडा नभ, भेदुन जाई !
'बापुजी' जातां–हा देश पोरका झाला ॥ ११ ॥

## प्रणति

१

स्वतंत्र भारत-भूमीच्या या, भाग्य-विधात्या ! तुला ।
प्रणति ही असो मदीय 'मंगला ॥
भाग्य-वल्लरी वठली होती, कळ्या किती करपल्या ।
गळूनी मृत्तिकेंत मिसळल्या ॥
अवनीं-गगनीं तिमिर त्यांत हे, ढग आले गडगडून ।
जीव हा जात असे थरथरून ॥
रितें अंक जाहलें कुणाचें, कुंकू भालिंचें पुसें !
आहुति मुक्ति-यज्ञिं पडतसे ॥
पडल्या होत्या, हातीं-पायीं, दास्याच्या शृंखला ।
जिव्हारीं घाव असे लागला ॥
किति 'अमीरीस' सोडुनी, फकिर जाहले ।
किति 'मंदिर' म्हणुनी, तुरुंगांत पातले ।
किति हांसत हांसत सूळावर लटकले ।
त्यागाची परिसीमा झाली, पुण्याई ये फळां ।
'महात्मा' थोर तयें लाभला ! ॥स्वतंत्र भारत॥

२

'यदा-यदाहि' या वचनाचें करावया पालन ।
धाडी प्रभु विश्व-वंद्य 'मोहन' ॥

'ईसा'–'मूसा'–'महंमदानें' धर्म हाच शिकविला ।
"बंधुनों ! पाळा माणुसकिला" ॥

लाथाडुन त्यां 'अमृत-कलशा', रुधिराचा अतिपूर—
वाहवी मानव धरणीवर ॥

'बापूजींचें' हृदय चरकलें, साश्रु नयन जाहले ।
'अहिंसा' दिव्य बोल प्रगटले ॥

नको तोफ–तलवार–संगिनी, अणू बाँब ते नको ।
राक्षसापरी वृत्ति ती नको ॥

घ्या मंत्र, अहिंसा-सत्य-क्षमा–प्रीतिचा ।
'बापूनें' दाविला, मार्ग जगत्-शांतिचा ।
जय-घोष घुमूं द्या, अखंड माणुसकिचा ।
मानव्याच्या दिव्य मंदरीं, ध्वज उभवाया चला ।
असे ही वेळ आज मंगला ॥ स्वतंत्र भारत ॥

# आकाश दीपास

किति उंच उंच तळपसी आकाश दीपका !
नभिं वायुसवें डोलशि, जन पाही कौतुकां ॥ ध्रु ॥

गगनांत चंद्र-सूर्य-गुरु-शुक्र, तळपती ।
अगणीत सान, थोर, तारका चकाकती ।
त्यांच्यापुढें पडेल तुझें, तेज सांग कां ? ॥ किति. १ ॥

'रविराज' अंतराळीं, रम्य रंग उधळितों ।
पडदे, रुपेरी, शाम, 'निशानाथ' सोडितो ।
तव लाल, निळा रंग गड्या ! त्यां पुढें फिका ॥ किति. २ ॥

वर वायु, वरुण, अग्नि, इंद्र, देव, राहती ।
गंधर्व, यक्ष, किन्नरादि, हे निवासती ।
त्यांच्यामधें, मिळेल तुला, अल्प-स्थान कां ॥ किति. ३ ॥

लेवून शुभ्र-वस्त्र 'कृष्ण-कृत्य' झांकिती ।
वर 'दारुबंदी' वदुन, 'व्हिस्कि' अमित झोंकिती ।
कुणिं आप्त-जनांच्या नांवें भरविती बँका ॥ किति. ४ ॥

बाहेर 'हरिजनांस' अति प्रीति दाविती ।
सदनांत शिवाशीव, सोंवळें न सोडिती ।
'मुस्लीम-हिंदु' पीळ, मनींचा सुटे न कां ? ॥ किति ५ ॥

टपलेत स्वराज्यांतिल लोणी लुटावया ।
हे पक्षवादी देशभक्ति दाविती वायां ।
हें पूण्यमूर्ति 'बापूजींचें' 'रामराज्य' कां ? ॥ किति. ६ ॥

जेथें न तुझें काज, तिथें तेज ओपिशीं।
जेथें न जरा मान, तिथें स्थान शोधिशीं।
अंधार तुझ्या खालीं 'असा' दिसत नाहीं कां? ॥ किति. ७॥

स्वर्गीय-गुणां घेऊन ये, निजसवें जरा—
दे विखरुनी तयांस, तोषवी वसुंधरा।
ये, तिमिर करी दूर, झणीं सान-दीपका! ॥ किति. ८॥

## प्रभु-दर्शन

29284 दि. ९।८५
क्रमांक 7343 ... नों: दि: 23/2

तूं कशास जाशी मंदिरांत दर्शना ?
करितसे तुझ्या बघ दारीं प्रभु याचना ! ॥ १ ॥

केशरी उटी नच लावियली अंगाला।
तुलसी, कुसुमांच्या, गळां न दिसती माला ! ॥ २ ॥

जरतारी वसनें, अलंकार रत्नांचें—
लागती भोग त्यां कधीं न पक्वानांचें ! ॥ ३ ॥

\+ \+ \+

वाऱ्यानें उडती, जटा तैल-विरहीत
तुलसी-काष्ठाच्या माळा कंठीं रुळत ! ॥ ४ ॥

लक्तरें फाटकीं, अंगाला झांकितीं
कधि न भरे त्याची झोळी, राही रिती ! ॥ ५ ॥

कुणि झिडकारुन बोलले, जरी कटु वच !
नच क्रोध तया ये, मनीं शांतिचें कवच ! ॥ ६ ॥

"जो देवे, न देवे, होवे उसका भला !"
संतुष्ट मनाचा, सवाल हा घोषिला ! ॥ ७ ॥

ऐकवीत चाले, महिमा प्रभु-नामाचा
जन-मनां वेधितें, त्याची मंजुळ-वाचा ! ॥ ८ ॥

* * *

या, अशा देऊळीं, वसतो 'नारायण'—
तूं उघड लोचनें, घे त्यांतच दर्शन ! ॥ ९ ॥

# प्रेम-ज्योत

हृदयाच्या मंदिरांत--लावियली प्रेम-ज्योत
किती शीत, तेंवि शांत
तेज तिचें फांकतसे !
सोनेरी किरण भरे
हळु हळु, तम दूर सरे ।
नयनींचे नील-कमल--मंद, मधुर हांसतसे ॥ १ ॥
भाव अती, मनीं उठती ।
वीचिंपरी, थरथरती ।
ध्येयाच्या दरियाचा--थांग कुणा लागतसे ? ॥ २ ॥
कांटेरी, कठीण वाट
दुर्गमतर वाळवंट
मानवतेचा अफाट, घाट, किती दूर असे ! ॥ ३ ॥
जरि न कुणी सांगाती
चालत जाईन पुढती
सत्याला नच भीती--जग उठलें जरि रोषें ! ॥ ४ ॥
माणुसकीची सतार—
छेडुनिया तार तार
आर्त-स्वरें जागवीन--जे पडलें मूर्च्छितसे ॥ ५ ॥
आशेची नव-प्रभात—
ये, तोंवर प्रेम-ज्योत--
तेवो, हृद्-मंदिरांत, प्रभु-राया ! मागतसे ! ॥ ६ ॥

# रिता-घट

घट रिता कुणीं कधिं ठेवियला—
भरणार नाहिं कां, कधिं बोला? ॥ ध्रु. ॥

सहज फिराया वनीं पातलें ।
विहिरीकांठीं जाऊन बसलें ।
घट-मातीचा 'रिता' पाहुनी ।
प्रश्न मानसीं हा उठला ॥ घट १ ॥

रा. क्र. ८०७५

एक कृशांगीं, काळी-सांवळी ।
भिल्ल बालिका, तिथें पातली ।
विहीरीवरतीं जाऊन ठेली ।
डोल करींचा ठेवियला ॥ घट २ ॥

लक्तर अंगावरी फाटकें ।
दोरखंडही होतें तुटकें ।
दारिद्र्याचे बसती चटके ।
दावि तिची कुदशा सकलां ॥ घट ३ ॥

नाचत, डोलत, 'डोल' चालला ।
विहिरीचा मग ठाव घेतला ।
युवति भराभर ओढी त्याला ।
थेंब जलाचा नच आला ॥ घट ४ ॥

छिद्रें पडुनी चाळण होई ।
थेंब जलाचा त्यांत न राही ।
ओढुन ओढुन थकुनी जाई ।
काळोखाचा पट पडला ॥ घट ५ ॥

नयनां मधुनी झरती मोतीं !
विहिरीमध्यें, जाऊन पडती !
कुणी तयांची केली खंती ?
किती मिसळतीं मातीला ? ॥ घट ६ ॥

रित्या-घटासम, भाग्य तयांचें !
फुटक्या डोळें, भरेल कैचें ?
'जीवना विना', 'जीवन' त्यांचें ।
'रितेंच' राहिल कां बोला ? ॥ घट ७ ॥

↑

# मानवतेची ज्योत

पेटवी मानवतेची ज्योत ।
आडविती त्यां सोडुन देईं
जरि असले गणगोत ॥ मा ॥

रुसो कुणी, करी त्याची न परवा !
मार्ग आक्रमी आपुला बरवा ।
पोंचव तूं संदेश जगाला--
परिसो, वा, न, श्रवोत ॥ १ ॥

आजवरी ज्यां दूर लोटिलें ।
तुच्छ लेखिलें, पशु-सम गणिलें ।
झोंपडींत त्यां, जाऊन वर्षव--
प्रेमाश्रुंचे स्रोत ॥ २ ॥

काळ्या बाजाराची होळी--
होईल, तेव्हां जाण दिवाळी
करोत 'काळें' लवकर देवा
दांभिक हे खद्योत ! ॥ ३ ॥

जातियतेनें अंध बनविलें !
धर्म, रूढीनें, पंगु केलें !
वैषम्याचे विष नाशाया !
अमृत-घन वर्षोत ! ॥ ४ ॥

गांवों-गांवीं, सदनीं, वदनीं ।
देशिविदेशीं, सर्व ठिकाणीं ।
"मानव्याच्या" संगीताचें--
सुन्दर नाद घुमोत ! ॥५॥

# जमीन द्या

असीम क्रांति जावया
अदम्य क्रांति व्हावया
जगांत शांति यावया
जमीन द्या--जमीन द्या ॥ १ ॥

मनांत त्वेष ना वसो
जनांत द्वेष ना दिसो
धनास स्थैर्य यावया
जमीन द्या--जमीन द्या ॥ २ ॥

समान-भाव साधण्या
सुखांत बंधु नांदण्यां
उपास-मार वारण्यां
जमीन द्या--जमीन द्या ॥ ३ ॥

विराट येइं पर्वणी
निनाद होइं घोषणीं
स्व-बांधवार्थ या क्षणीं--
जमीन द्या--जमीन द्या ॥ ४ ॥

महान्-यज्ञ मांडला
प्रकाश दिव्य दाटला
'विनोजी संत' पातला
जमीन द्या--जमीन द्या ॥ ५ ॥

# दयाळा ! त्या क्षणीं पाणी

१

दयाळा ! त्या क्षणीं पाणी
तुझ्या मी देखिलें नयनीं !

घाण नेतात डोईवरी–कराया स्वच्छ ही नगरी—
भुकेलें अर्धपोटीं तें–करूनी कष्ट अति भारी !
जनांतें वदुन 'मा', 'बाप'–जित्याचा मान जे देती
करीती नित्य 'जोहार'–'हार' घेऊनिया जगती
जवळ येतांच 'हरिजन' तो–सोंवळेधारी विप्रांनीं।
" 'अछुत !' चल दूर हट " म्हणुनीं–विंधीलें, शब्द–बाणांनीं !–

दयाळा ! त्या क्षणीं पाणी—
तुझ्या मी देखिलें नयनीं !

२

जरठ ये पेशीं वर्षाचा–पांचवी पत्नी वरण्याला
लोटिती होमकुंडीं त्यां–लोभी–जन, षोडशीं–बाला !
'मढयाला' घालितां माळ–करुण–किंकाळी फोडूनी–
मूर्च्छिता होउनी पडली–बालिका वेली–सम धरणी !–

दयाळा ! त्या क्षणीं पाणी—
तुझ्या मी देखिलें नयनीं !

३

वाजलें बिगुल युद्धाचें-उसळलें रक्त युवकाचे
वारण्या दुःख देशाचें-करी बलिदान देहाचें !

'माय भू' वैभवां चढवी-करूनिया प्राण-दानाला
'माय' त्याची भिकारिण हो-विसरलें जग, 'हुतात्म्याला !'

लेउनी शुभ्र-वसनां, जे-दाविती त्याग व्याख्यानीं
दीन-माता पुढें येतां-कुशब्दें ताडिलें त्यांनीं—

दयाळा ! त्या क्षणीं पाणी
तुझ्या मी देखिलें नयनीं !

४

दांत मोत्यांपरी दिसती-तारका लोचनीं वसती !
रमे कीं शीर्षि भृंगतति-सुमां सम मृदुल नव कांतिऽ !

आश्रमांतिल अनाथांच्या-'बाळ' तो याचना करितां ।
'कारट्या ! दूर हो' म्हणुनी- मदांधें, मारिल्या लाथा ।

मनींची मावळे माया-कृत्य करितात सैतानी
निखारे पंकजावर कीं,-उधळिलें क्रूर दुष्टांनीं !

दयाळा ! त्या क्षणीं पाणी—
तुझ्या मी देखिलें नयनीं !

५

तुझ्या अभिषेकिं !किती देवा !-दूध, दहीं, तूप, मध, जाई
रोगी वा सान-बाळांना-मिळे लव-बिंदु नच पाही !
'हृदयींच्या राऊळीं' केली-घाण अति स्वार्थ-साधूंनीं
तुझ्या नांवें करीती, दुर्बलांची-दुष्ट ! 'कुरबानी'

दयाळा ! त्या क्षणीं पाणी—
तुझ्या मी देखिलें नयनीं।

## अंधमाता

१

हे ईश्वरा ! निमिषांत तूं भू-गोल सारा बनविला ।
वर नील-मंडप लाविला जलसिंधु खालीं पसरिला ।
हिम शैल-शिखरें बनविलीं वसुधेस साजें सजविलीं ।
पण अन्ध-नयनें या तुझी, कारागिरी नच देखिली !

२

तेजोनिधि ! तूं निर्मिले, तेजस्वि रवि-शशि चांदण्या-
रत्नें, जवाहर, मोती, माणिक, लाल पांचू, हिरकण्या !
ज्वालामुखीं तू बनविला, तेजास्विनी सौदामिनी,
तूं तेज खद्योतां दिलें, भरले न माझ्या लोचनीं !

३

मी ऐकिलें जन बोलती, ' ऋतुराजीं वनदेवी खुले ।
नव परिणीता नव बालिकेसम, अंग अंग तिचें फुले ! "
रानीं वनीं रंगीं-दुरंगीं, कुंज-पुष्पें शोभती ।
या अंध-नयनां ना दिसे, कैसे मधुप गुंजारती !

४

जरि काळ-सर्प विषारी तो अंगावरी ये चालुनी--
' मोटर ' जरी जवळून जाई, भान त्याचें ना मनीं ।

भिक्षा मिळाया भटकतों, मी आणि माझा घरधनी ।
कोणी दयाळू, चार पैसे, हातीं देती येउनी !

५

तूं न्यायि अवघ्या सृष्टिचा, अन्याय करिशीं ना कधीं !
मज जन्मतांची आंधळें, केलें कसें न कळे ? विधी !
या दृष्टिवाल्यांचा मनीं, मी, द्वेष केला ना कधीं !
कटु-उत्तरें, किती ऐकिलीं, पण रोष केला ना कधीं !

६

हें विश्व-सुन्दर पाहण्याची लोचनीं आशा नसे !
ऐश्वर्यवाल्यांच्या सुखाची, हृदयीं अभिलाषा नसे !
दुनिया दुरंगी, तींत मिळण्याची, मुळीं मनिषा नसे !
दे दान देवा ! एवढें, बघ आंचलीं भिक्षा नसे !

७

ज्याच्या चिमुकल्या पावलांनीं, राजवाडे शोभती ।
ज्याच्या युगुल-नेत्रां पुढें नक्षत्रगणही लाजती ।
हास्यांत वा रुदनांत ही ज्याच्या वसे नव माधुरी !
जो जन्मतांची जननिच्या झणिं, प्रसव दुःखातें हरी !

८

उपकार तव मानूं किती ? मज 'मातृ-पद' देवा ! दिलें !
ज्याचे पुढें सुर, मानवांनीं, शीष आपुलें नमविलें !

ही आंधळीची कांठी मम आशा किती येथें वसे !
मज निर्धनेची, हीच देवा ! सर्व संपत्ति असे ?

९

हृदयांतरीं वसशीं जरी, कल्लोळ पाही अंतरीं
तव दर्शनाची आस, ना क्षण, हट्ट, धरिल ना, हरी !
मी 'अंध-माता' नच दिसे, कुल-ज्योत' माझी तेवते,
बाळास बघण्या दृष्टि दे, प्रभु ! एक वारच ! मागते ।

# गिरणीचा भोंगा

१

हा धूर, जाइ अति दूर, किती भेसूर-
करितसे कहर—
गिरणीचा भोंगा, काढी कर्कश सूर !
करुनिया ऊंच निज-मान, दावि अभिमान आणि करी कथन-
परिसा हो ! त्याचे बोल चित्त देऊन—
' ऐकुनी मदीय आवाज, सारुनी काज, लोक जमताती ।
यंत्रासम आपुल्या कामीं गुंगुन जाती ।
' धनी ' माझा दिलाचा राजा, पुरवितो गरजा कामकऱ्यांच्या-
नच ' लेबर-कोर्टा ' पुढें कधीं जायाचा !
' जाबर ' ही जब्बर, गब्बर होई किती !
' म्यानेजर ' माडी रची, ' कार ' उडवी ती !
' चंदेरी ' पडदे ' कृष्ण-कृत्य ' झांकिती !
मजुरांच्या कष्टांवर, पुन्हां दो चार, मील उभवील--
मम मालकांस येतांच जराशी लहर ' ॥ हा. ॥

२

" सुन्दरी, पडे जैं नजरीं, कटाक्षां मारी, कुणी सैतान !-
पोटास्तव ' अबला ' गिळी सर्व अपमान !
धाग्यांचे उडती तंतू, क्षयाचे जंतु, देहीं भिनतात ।
कुणि दमा लागुनी, खगुनिया मरतात ।

वस्तिची, मुलां शिकण्याची, दवा-पाण्याची, सोय नच कांहीं-

यंत्रासम मानव अिथें कोंबुनी राही ।

नच अिथें वाचनालय, सुटीचा व्यय, उचित करण्यास ।

नच प्रौढ शिक्षणालयें ज्ञान मिळण्यास !

जणु मील-मजूरा सुख-दु:ख न लागलें ।

गिरणींत जाउनी मन, मशीन जाहलें ।

दिन-रात कष्टुनी कंगालच राहिलें !

कथिं धूर, कशी अंधेर, येउनी चोर, लुटतसे वहर—

मजुरांचें-साठीं मात्र राहिले जहर । ॥ हा. ॥

卐

## फूटपाथच्या मुसाफरास

मखमली गादी, 'फूटपाथची' घेऊन दळदार।
किती काळ झोंपशीं मुसाफर! कां नच दरकार? ॥ १ ॥

जीवनांतलें नैराश्याचें गाठोडें भरूनी
कृपणासम घेऊन उशाला, झोंपशीं घोरूनी ! ॥ २ ॥

+ + +

पहा समोरी, ऊंच हवेली, पंखे बिजलीचे—
डुलती, घुमती मंजु-मनोहर सूर 'रेडिओचे !'
विंझणवारे तुला घालिती, तरु ते मार्गीचे
रात किडयांचें, कानीं घुमतें गाणें चिलटांचें ! ॥ ३ ॥

झगमग करिती, दिवे विजेचे किती रोषनाई
तुजसाठीं नभिं नक्षत्रांची दीप-माल पाही ! ॥ ४ ॥

वर्षा, ग्रीष्म, न तुला गांजिती, शिशिराशीं दोस्ती—
योगीशा-सम, मग्नबैसला, येऊन एकांतीं ! ॥ ५ ॥

तुला निराश्रित पाहुन कोणां, दया जरी वाटे
त्वदंतरीं नच द्वेष-बुद्धिची मशाल ती पेटे ! ॥ ६ ॥

व्यथित मनाच्या, तुझ्या भावना, सुप्त आज होती
खडबडुनी जागवील त्यांना, बा ! ही कालगति ! ॥ ७ ॥

आज तुला जरि, तुच्छ लेखिती, "लक्ष्मीचे लाल"
निराश जीवा ! राहशील कां, नित्यच कंगाल ? ॥ ८ ॥

स्थिर धरणीचा, भूकंपानें पृष्ठ-भाग हलतो ।
स्फोटा संगें, मेरु मधुनी, लाव्हा-रस गळतो ! ॥ ९ ॥

पतन आणि उत्थान येतसे, जैसे दिन रजनी
नियतीचा क्रम, नित्य चालला, अखंड हा अजुनी ! ॥ १० ॥

× × ×

नको थरारूं ! दौलत हृदयीं दुःखाची धरुनी !
उत्क्रांति तुला, नेईल सत्वर, हात गड्या ! धरुनी ! ॥ ११ ॥

सहिष्णु जीवा ! तोंवर कंठी कष्टद काळाला !
एक दिवस ही ठिणगी लाविल, आग महालाला ! ॥ १२ ॥

## कृषिवलास

कृषिवला ! धन्य तूं खरा सुखी !
प्रभु, चिरंजीव तुजला राखी ! ॥ कृ. ॥

गो-धन उघड तव बांधावरी ।
नको तयाला बँक, तिजोरी ।
राखणदार ही नको त्यांवरी ।
बघुन तया तूं सदा सुखी ! ॥ १ ॥

वर्षा, ग्रीष्में तूं न गांजला ।
शीत, वात, नच तापद तुजला ।
हातीं नांगर, विळा घेतला ।
प्रभु-नामाचा घोष मुखीं ॥ २ ॥

गहूं भात, हरभरा पिकविशीं ।
फळा-फुलांच्या अनंत-राशी ।
अ-मोल धन हें जगीं लुटविशीं ।
चटणी, भाकर, तुझ्या मुखीं ॥ ३ ॥

नको तुला 'मोटार' बसाया
नको बंगला भव्य रहाया
शेत, गुरें, अवघी तव माया
निगा नित्य त्यांची राखी ॥ ४ ॥

हिरवळीचा गालिचा मखमली
तरु-राजाची शीत सांवली
पवन स्वयें तुज वारा घाली
निद्रा-माता घेइ कुशीं ॥ ५ ॥

त्यागी, महात्मा, तूंच खरोखर ।
घोर तपस्या तुझी निरंतर
इतर जनांची तळमळ वर वर
वृथा मिरविती ते शेखी ! ॥ ६ ॥

# माझीया ग ! अंगणांत

माझीया ग ! अंगणांत ।
पिंपळाच्या झाडावर
हितगुज पांखरांचें ।
चालतसे रातभर ॥ १ ॥

झांकळुनी वसुधेला ।-
दिनकर दूर जाई
अंकि घेउनी सृष्टीला
शांति गातसे अंगाई ! ॥ २ ॥

पिंपळाच्या झाडावर
'काक' येऊन बैसले ।
दुज्या बाजू, बगळ्यांनीं-
स्थान आपुलें राखीलें ॥ ३ ॥

काळ्या, काळ्या, कावळ्यांची-
कर्ण-कटु 'काव' चाले
शुभ्र बगळ्यांनी दंभ--
नेत्र मिटुन मांडले ! ॥ ४ ॥

सान, सान, चिमण्यांना-
मैना, शुक, सारीकांना-
विशाल त्या वृक्षावर
स्थान नसे दुर्बलांना ! ॥ ५ ॥

त्यांनीं सभा भरवाव्या
त्यांनीं करावा गोंगाट
धूर्त, दांभीकांना बंध-
नसें, फिरावें मोकाट ! ॥ ६ ॥

जिथें 'काक', 'बगळ्यांची'
नित्य जमते मैफील-
तेथुनिया दूर जाई--
कलावंत तो 'कोकीळ' ! ॥ ७ ॥

# हंसा प्रति

उंच गिरिवरी—मान सागरीं
स्वैर विहरशी—कलहंसा ! ॥ १ ॥
घेशि भरारी—क्षणांत भारी
स्पर्शुन येशी—गगनासी । ॥ २ ॥
नील-मणि परी—शीतल-वारी
तृष्णा सारी—वाराया । ॥ ३ ॥
विसतंतूचा—चारा तुजला
मौक्तिक माला—चाखाया ।
कुमुद्वती या—कंज कळ्या त्या—
शशि, रवि—संगे-रमतात ॥ ५ ॥
त्यांचें हंसणें—रुसणें सारें
कुतूहलें तूं—बघतोस ! ॥ ६ ॥
खालीं येउनी—पहा निरखुनी
दैन्य व्यापुनी—किति राही ! ॥ ७ ॥
दूर राहती—ते, न जाणती
दुःख, खालचा, किति साही ! ॥ ८ ॥
जगांत मिळुनी—जीवन त्यागी !
नको अभागी—एकांत ! ॥ ९ ॥
काकांची ही—थांबव भाषा—
ये कलहंसा ! डौलांत ॥ १० ॥

# जंगली गोटे

ऊंच भव्यशा, नगरायाच्या, पायदळीं पडले-
शिला-खंड, जे कालौघानें, ढळुनी गडगडले ॥ १ ॥

कुणी तांबडे, धूसर कोणी, कुणी शुभ्र काळे-
असतिल 'शाळीग्राम' त्यांतही 'हीरक' किति लपले! ॥ २ ॥

महिने गेलें, वर्षे गेलीं, आयुष्यही सरलें
संस्काराविण, जीवन त्यांचे मातीमोल ठरलें ! ॥ ३ ॥

\+ + + +

तसें—गिरीच्या, भव्य आश्रयाखालीं राहून-
किति विखुरले लोक, राहती दुःखां साहून ! ॥ ४ ॥

कुणी, 'भिल्ल', 'तडवी', 'वंजारी', 'कोरकु' ते 'गोंड'-
पुढारलेले वदती ज्यांना, 'सामाजिक धोंड' ! ॥ ५ ॥

उत्कर्षाच्या शिखरावरुनी जे खालीं पडले-
जडत्व आलें, दैवीं त्यांच्या, संस्कार न घडले ! ॥ ६ ॥

\+ + + +

कोण चतुर शिल्पज्ञ तयांना जमवुन सांधील ?
विशाल सुंदर, मानवतेचें मंदिर बांधील ! ॥ ७ ॥

# लोकशाहीचा ध्वज फडकूं द्या

आतां 'चंदेले' 'बुंदेले' 'केसरिया 'वाले-
गेले, भिडति न, रजपूतांचे भाल्याला भाले! ॥ १ ॥

'ताजमहल' तो बांधुन ज्यांनीं जगतां दिपवीलें
'मोंगल' गेले त्यांच्या-सह ते कलावंत गेले ! ॥ २ ॥

आतां गेली 'निजामशाही' अन् 'आदिलशाही'
आतां झाला विमुक्त-भारत, विषण्णता नाहीं ! ॥ ३ ॥

'शिवरायाची' 'शिवशाही' नच उरे 'पेशवाई'
जींत दाविली, झुंजारांनीं संगर-चपळाई ! ॥ ४ ॥

'तात्या' 'भाऊ' आतां नाहीं 'झांशीची बिजली'
'टोपीवाले' इंग्रज' गेले स्वतंत्रता आली।
कारावासीं कष्ट सोशिले, सूळावर चढले-
त्या वीरांच्या, बलिदानाचें, फळ हातीं आलें। ॥ ५ ॥

सोडा आतां स्वार्थ, क्षुद्रता, दंभ, द्वेष, सोडा-
तोडा बेडी जातियतेची 'मानवता' जोडा। ॥ ६ ॥

हिंदु, मुस्लीम, शीख, इसाई, वागा प्रेमानें ।
'लोकशाही' चा ध्वज फडकूं द्या गगनींडौलानें ॥ ७ ॥

★

## पार्श्वनाथास

मी दर्शनां आलें तुझ्या, प्रभु! पार्श्वनाथा! धाउनी
पाहूनिया तव सोहळा, किति प्रश्न येती मन्मनीं।
स्फटिकास स्वकरें कोरुनी, तव मूर्ति ज्यानें घडविली।
त्या चतुर शिल्पज्ञापुढें, मी मान ही क्षण झुकविली! ॥१॥

तव भव्य-मूर्ति देखतां जुळलेंतकर शिर वांकलें
तव रत्न-मंडित लोचनीं, किति तेज होतें फांकलें
रेखीव, ग्रीवा, नासिका, 'पद्मासनीं' तूं स्थिर, परी—
अस्पष्टसें स्मित झळकतें, तव दिव्यशा वदनांवरी। ॥२॥

तूं तप्त होशी ना कधीं, मग चंदनां कां चर्चिती?
त्वद्-हृदय-पुष्यांहून हीं, तुज हीन-पुष्पें वाहती!
सौगंध वाणीचा तुझ्या, बघ आसमंतातें भिडे—
देतील कीं परिमल तसा, निर्जिव ऊदाचे हे खडे? ॥३॥

बांधून पट नाकावरी, येतो पुजारी तुजपुढें।
श्वासामधें अदृश्य ते, नच 'जीव' जावो बापुडे!
मेळा किती हा भाविकांचा दर्शनां तव लोटला!
कुणि फिरवितो, माळा त्वरें, कुणि मंत्र सत्वर बोलला ॥४॥

प्रभु! पूस त्यांना, 'सत्य' तूं कीं पाळिलें निशि-वासरीं?
त्वां शब्द-शर सोडून 'हिंसा' केली नच भूमिवरी?

'न्यायी'पणानें वागुनि किति, संपदा तूं मिळविली ?
किति दुर्बलांचीं आंसवें करुणार्द्र होऊन पुशियलीं ॥५॥

नच धर्म शिकवी, द्वेष करण्या, कां वृथा मग फूट ही ?
गेली क्षमा, प्रीति निमाली, चालली लयलूट ही !
या विभुतिनों ! पैगंबरांनों ! या पुन्हां पृथ्वीवरी !
निर्मळ करा मन, मानवांचें, प्रेम भरुनी अंतरीं ! ॥६॥

तूं पार्श्वनाथा ! स्तब्ध शीलेच्यापरी, राहूं नको।
हें विसरलें जग 'परिग्रहां' तूं विमुख, लव होऊं नको !
करण्यास हिंसा मानवांची, शोध लावीती कुणी।
तू 'सत्', 'अहिंसा', 'शांति'चे, पीयूष-कण देउधळुनी ! ॥७॥

# दीप घेउनियां करीं

१

भू-गोल सारा लखलखे, किति दीप-माला लागल्या।
देवांगनांनीं तारकांच्या, दीपराशी लाविल्या।
आली दिवाळी, हर्ष उधळी, अंतराळीं भू-तळीं।
उजळी न परि काळी अमावस, "दीप घेउनियां करीं"।

२

ज्यांच्या श्रमें, शेतींत कणसें, मोतीयांनीं लादती।
ज्या "धेनु, वत्सां" आर्य-ललना, भक्ति-भावें पूजिती।
ती क्षीण होतां माउली, देती कसायाचे करीं।
नच पीळ पडतो अंतरीं, बघ "दीप घेउनियां करीं"।

३

कोणी धनिक, धन पूजनासी, नेत्र मिटुनी बैसला।
तें कांचनाचा ढीग तो, उपहास करुनी बोलला।
हे दांभिका! मजसाठीं तूं, किति कंठ चिरिले अजवरी।
तव हात रक्तें माखले, बघ "दीप घेउनियां करीं"।

४

नरकासुरातें मारुनी, 'हरि' भार जगताचा हरी।
उठुनी प्रभातीं, तूं जरी, अभ्यंग-स्नानातें करी।
वपु जाहली निर्मळ तुझी, डोकाउनी लव अंतरीं।—
गेलें मनो-मालिन्य कां? बघ, "दीप घेउनियां करीं"।

५

किति रोषनाई ही पहा. फुटती फटाके धडधडा।
हे "लक्ष्मि-सुत" 'वहितें' पुजोनी "सोहळा" करिती बडा।
लुटिलीं किती शेती, घरें, किति बनविले भिक्षेकरी?
किति अश्रु पडले वही'वरी? बघ, ' दीप घेउनियां करीं ।

६

ज्याच्यापुढें कर पसरुनी, प्रभु दान घ्याया पातला।
शिर देउनी, नृपती 'वली' तो, धन्य होई भू-तलां।
तूं दाविशी वरुनी जरी, औदार्य बली-राजा परी।
किती कृपणता तव अंतरीं, बघ, "दीप घेउनियां करीं"

७

नेत्रीं निरांजन घेउनी, भगिनी तुला ओंवाळती।
निष्काम बंधु-प्रेम देती, भाव मंगल दाविती।
ओंवाळणी त्या मागती 'निज मातृभूतें उद्धरी"।
दिधली तुवां ती भेट कां? बघ. "दीप घेउनियां करीं"।

८

अति तीव्र-वारा, 'द्वेष-स्वार्थाचा' सुटे भू-मंडलीं।
हृद्दीपकाचें "स्नेह" आटे, ज्योत निष्प्रभ जाहली।
बघ दाटलासे, तम किती, सदनांत वा गिरि-कंदरीं।
चल अमर-प्रीति-ज्योत लाऊं, "दीप घेउनियां करीं"।

## मागणें

तुला पहावें, आणि जिवाचें, दुःख घालवावें
कन्हैया! हेंच मला द्यावें ॥ १ ॥

तुझ्याच ध्यानीं, तुझ्याच गानीं गुंग सदा व्हावें
दयाळा! तुला आळवावें ॥ २ ॥

तुझेंच सुंदर रूप पाहतां रंगुनियां जावें
जगाचें नातें विसरावें ॥ ३ ॥

मुक्या मनाचें मंजुळ गाणें तुला ऐकवावें
मुकुंदा! दास तुझे व्हावें ॥ ४ ॥

तुझ्याच पुढतीं हृद्‌गत सारें सखया! सांगावें
भिकारी तुझाच कीं व्हावें ॥ ५ ॥

निशिदिनीं मनोला ओढ तुझी लागुं दे।
जन म्हणोत वेडा वेड तुझें लागुं दे।
जरि असेल तरिही, गोड स्वप्न राहुं दे।
'मी पण' माझें तुझ्यांत देवा विरूनीयां जावें
दयाळा! दान हेंच द्यावें ॥ ६ ॥

# आतां नको जयघोष

आतां नको घंटा-नाद – आतां नको जय-घोष
आतां गरीबाचें मुखीं – सुखें पडो चार ग्रास! ॥ १ ॥

\+ + +

आतां नको मंजीरींचा – मालतीचा पुष्प-हार
आतां श्रमिकांचा घेई – उचलुनी कष्ट-भार! ॥ २ ॥

\+ + +

'रामेश्वर' 'काशी' यात्रा – नको 'पंढरीची' वारी
चंद्रमौळी झोंपडीचें – आतां कारुण्य निवारी! ॥ ३ ॥

\+ + +

आतां नको प्राणायाम – योग तप, तैसें ध्यान –
आतां दलितांना मनीं – 'मानवा'चें परी मान! ॥ ४ ॥

\+ + +

आतां भेद, द्वेष, वैर – जळो, स्नेह-निरांजनीं।
आतां, 'मानव्याचें' गाई – गीत भजनीं, कितनीं! ॥ ५ ॥

卐

# चिरंजीव हो

(ता. १२-३-'५५ ला नागपूर येथें पं. जवाहरलालजी वर बाबुरावनें आक्रमण केलें तें वांचून)

चिरंजीव हो चिरंजीव हो,
वीर 'जवाहर'! राष्ट्राधार!

तूं भारतचा भाग्य-विधाता
दीन-जनांचा पालन-कर्ता
तूं तोषविशीं भारत-माता—
शांति-दूत साकार! ॥ १ ॥

जनतेच्या हृद्‌सिंहासनिंचा -
तूंच विराजित राजा साचा -
गौरवशाली, महानतेचा -
तूंच दिव्य-अवतार! ॥ २ ॥

जन-सेवेचें जे व्रत घेती -
बलिदानाचें लेणें लेती!
तलवारीच्या धारेवरती -
चालत जाती पार! ॥ ३ ॥

जहर, जाति-धर्माचें जाईल।
वैषम्याचा, विनाश होईल -

धरा सु-मंगल अवघी होईल –
तेव्हां प्रेमागार ! ॥ ४ ॥

चिरंजीव, प्रभु राखी तुजला।
दूर करो संकट-बाधेला।
शांति-मंत्र जगतां द्यायाला –
देवो आयु अ-पार ! ॥ ५ ॥

चिरंजीव हो – चिरंजीव हो
वीर 'जवाहर'! राष्ट्राधार!

# अभंग वाणि

१

तुझें रूप माझ्या नयनांत ठसो-सुख असो नसो, पांडुरंगा !
तुझ्या गुण गानीं, रमो माझें मन-असो नसो मान, पांडुरंगा !
तुझ्या भजनांत, नित्य रमो चित्त-असो नसो वित्त, पांडुरंगा !
तूंच बा ! असावा, जिवाचा विसांवा-अन्य न दिसावा, तुजवीण !

२

शोडषोपचारें पूजन करावें-कैसें नच ठावें, मजलागीं ।
भजन, कीर्तन, कैंचि बा ! करावें-श्रवण न ठावें, मजलागीं ।
जप, तप, ध्यान, आणि प्राणायाम, मज घनश्याम ! नच ठावें ।
आळविती तुज, कैसे भक्त-राज-मज महाराज ! शिकवावें !

३

तुझें पुष्प, गंध, तुज वाहुनीया, भक्ति देवराया ! दावीतात ।
नाना विध तूंतें, करिती नवस, कसे तुज स्वार्थी, मानीतात ।
नाटकी जगाची, बघुनिया रीत, पडे माझें चित्त, संभ्रमांत ?
माझें पैसें कांहीं, मजपाशीं नाहीं, काय तुज वाहूं ? भगवंत !

४

सख्या-सोयऱ्याचा, पाश तोडियेला मोह मिटवीला बरें केलें !
लटकीच होती, मजवर प्रीति, दाविली प्रचीति, बरें केलें !

पट सारियेला, उभयांमधील, उधळीला खेळ, वरें केलें !
आतां नको अंत ; पाहुं कृपावंत ! भेटीसाठीं चित्त, बावरलें !

५

आशेचा मनोरा, उंच उभवीला-ढांसळून गेला, वरें झालें !
रम्य भावनांची, बाग लावियेली, जळुनियां गेली, वरें झालें !
प्रीतिच्या हिंदोला, वर टांगलेला, तुटुनियां गेला, वरें झालें !
सुकलें मानस, उडे कल-हंस, मिटविली आस, वरें झालें !

६

धांव घेई आतां, त्रिलोकीच्या नाथा ठेविलासे माथा, तुझ्या पायीं !
शीणले लोचन, प्रतिक्षा करून, तुवां आगमन, केलें नाहीं ।
दाटला उमाळा, रुद्ध झाला गळा, क्षीणता तनूला, येई पाही ।
गरुड भरारी, घेऊन मुरारी ! येऊन सत्वरीं, भेट देई !

७

माझी कल्पवल्ली, माझा कल्पवृक्ष तुजविण मानूं श्रेष्ठ कोण ?
तूंच कामधेनु, कैंवि कीर्ति वानूं-तुजवीण मानूं श्रेष्ठ कोण ?
पूर्ण, मनोरथ, कराया समर्थ, कोण शक्तिवत, तुजवीण !
मज गरीबाची, ठेव तूं अमोल, त्रिलोकींचे मोल तुच्छ गमे !

८

'अमृत 'नांवाचा, गुण गरळाचा-ऐशा मानवाचें. जळो जिणें !
देई नच छाया, आणि पुष्प, फळ, ऐश्या विटपाचें, जळो जिणें !

तृषार्त धरेस, दे, न जलबिंदु-ऐशा जलदाचें, जळो, जिणें !
नांव आणि रूप, काय जाळायाचें, जों न वारी ताप, सद्गुणानें !

९

कुठवरी देवा ! तुला आळवावें-तुज बोलवावें, कुठवरी ?
कुठवरी देवा ! अश्रु हे ढाळावें-हृदयीं जळावें, कुठवरी ?
कुठवरी देवा ! प्रतिक्षा करावी-निराशा सहावी, कुठवरी ?
मृतापरी देवा ! तुझ्या जगतांत-फिरूं जगन्नाथ ! कुठवरी ?

१०

धन, मान, ज्ञान दिलें इतरांना-कांहीं न उरलें तुजपाशीं !
प्रेमळ सज्जन, दिले इतरांस-राहिलें न शेष, तुजपाशीं !
ऐशा समयीं कां, मज निर्मिण्याची-त्वरा, सांग केली ? हृषी केशी !
तुझें म्हणवावें, यातना सहाव्या-शिरावरी घ्याव्या, दुखःराशी !

११

तुझ्या दरबारीं हाच काय न्याय-मिळे देवराय ! दुःखितांसी !
विपरीत रीत, देव लोकची ही--उमगली नाहीं, पामरांसी ।
'दीनबंधु' तूंतें, म्हणती दयाळा !--कां न देखिली ही दीन-दासी ।
नामाचा महिमा, देवा ! मज दावी-चित्तीं नच ठेवी, संशयासी !

१२

'हृदयीं वसतो' ऐसे म्हणवितो-हृदयाचे हाल, पाहशीं कां ?
दया, क्षमा, माते, दाविशीं न देवा। पाषाणा समान राहशी कां ?

चातका समान, जीव तळमळे-येई घन-श्याम ! वळुनीया !
जळतसे चित्त करी तया शांत-विभो ! कृपामृतां, सिंचूनीया !

१३

तुझ्या पायरीचा, दगड मी व्हावा हेंच मज देवा ! दान देई !
संतांचीं पाऊलें, पडो माझे शिरीं मागणें मुरारी ! अन्य नाहीं !
तुझ्या आरतीचा, कापुर मी व्हावा, देह हा जळावा, तुझे काजीं !
तुझ्या जगीं त्याचा पसरो सुवास, हीच मनीं आस, नित्य राही !

१४

चंद्रभागे तीरीं, नाहीं 'रुखमाई'-नाहीं 'पांडुरंग' पंढरींत !
हिमाद्रिचे ठायीं, 'पार्वती' वसे ना-नसे 'विश्वनाथ' मंदिरांत !
नसे अयोध्येंत राजा, 'रामचंद्र'-नसे 'श्याम' 'कान्हा' गोपूरांत !
नको शोधुं देव, राऊळीं, वनांत-राही 'देवबाप्पा' अंतरांत !

१५

नको घंटानाद, टाळांचा गजर-नको पडसाद तंबोऱ्याचा !
टिळा चंदनाचा, नको पुष्पमाला-देव ना भुकेला, नैवेद्याचा !
नको अभिषेक, नको अन्नकोट-भुकेल्यांचे पोट, आधीं भर !
लोक-हित काजीं, वेंची तन, धन-त्यांत राही राजी, विश्वंभर !

१६

दगड, विटांचे, रचुनिया थर-'मंदिर' 'मशीद' बांधीयेले !
तेच कारागीर, तेच रे ! मजूर-तुझें देवघर ज्यांनीं केले !

धाई धाई जाशी, कराया स्तवन-ऐकुनी 'अजान' धांवतोस !
काय तुजपाशीं, नाहीं देवराणा ? वृथा भोळ्या मना ! धुंडतोस !

१७

करी मनुजांची धारणा, तो धर्म-हेंच तुवां मर्म, सोडियेलें !
शांतिची पांखर, घाली जगावर-'इस्लामा'चे सूर, तोडियेले !
दीन, पंगूवरी, करी भूतदया-'येशूचे' वचन, मोडियेले !
'धर्म-प्राण' गेला, रुढीच्या शवाशीं-मानवा ! तूं नातें जोडियेलें !

१८

उंच अभाळांत, नाहीं 'देवबाप'-त्याचें पाही रूप दीन-जनीं !
नको कंठशोष, नको जयनाद-ऐक त्याची साद, आर्तस्वनीं !
लक्तरांत येई, तुझें दारीं हरी-द्रौपदीची लाज झांकणार !
त्रिलोकाचा नाथ, पसरितो हात-त्यांत शोधुनी घे विश्वंभर !

29268 ५१०५
卐 93२3 २३।१।५

# अमर तुझें बलिदान

अमर तुझें बलिदान, हुतात्म्या !
अमर तुझें बलिदान !

मेरु-परी तूं शांत राहिला, उठलें जरी तूफान !
स्वातंत्र्याच्या रणांगणीं तूं, दिधले हांसत प्राण ! ॥ १ ॥

घालित होते क्रूर 'फिरंगी' नृशंस ते थैमान
तूं उभवीला ऊंच 'तिरंगा' राखिलास सन्मान ! ॥ २ ॥

अश्रु-वायुनें शांति-वीर ते झाले किति बेभान
अबला, शिशुवर झाडीत होते गोळ्या जणुं शैतान ! ॥ ३ ॥

'दीव', 'दमण', 'गोव्या'ची धरणी झाली पावन-स्थान
मुक्ती-साठीं जिथें हुतात्मे देती निज बलिदान ! ॥ ४ ॥

तुझ्या रक्त-बिंदूतुन उठतिल, 'राम', 'कृष्ण', भगवान !
क्षणांत देतिल, मुरगळुनी जे, उन्मत्ताची मान ! ॥ ५ ॥

धन्य हुतात्म्यांनों ! राखियला देशाचा अभिमान !
स्वातंत्र्याची प्रभात येईल, तुझें गात यश-गान ! ॥ ६ ॥

# आशा दीप

१

रात किती ही भेसूर
काजळली चोहींकडे
दिसत न पाय वाट
सांग कशी जाऊं पुढें ?

२

रात किडयांची कर्कश--
किर्र, किर्र ही चालली—
कुठें श्वान ओरडती
वृक्षीं वागुळें लोंबलीं

३

पायीं बोंचुनी कंटक--
बघ जाहली चाळणी
घळ घळ रक्त गळे--
दैव करी हेंटाळणी ?

४

थरारुन जाईं ऊर
वाट किती घोर, दूर
हृदीं माजलें काहूर--
वाहतसे अश्रु-पूर !

५

ऐकूं नच येई कानीं
कुणा पथिकाची साद
थांबु नको जाई पुढें--
उठे मनीं पडसाद !

६

घेउनीया 'आशा-दीप'--
जाई, यात्रिका ! अंधारीं
तुझ्या स्वागतां येईल—
रम्य दिवाळी साजरी !

अनुक्रम 29268 वि:
क्रमांक ....93483... नों: दि: 23/9/86
REFBK-0008715
REFBK-0008715